# संपादकीय

कोणत्याही क्षेत्राचा विकास त्या क्षेत्रातील सक्रिय सभासदांच्या योगदानावर अवलंबून असतो; तसाच तो शासकीय धोरणे, कार्यक्रम, नियम, कायदे, यांवरही अवलंबून असतो. संबंधित क्षेत्राच्या विकासासाठी खाजगी, निमसरकारी व शासकीय संस्थांचे योगदानही आवश्यक असते.

ग्रंथालयक्षेत्राचा विकास होण्यासाठीसुद्धा वर नमूद केलेल्या घटकांचे योगदान आवश्यक आहे. त्यांपैकी व्यक्तिगत योगदानाची अनेक उदाहरणे आपणांस ग्रंथालयक्षेत्रात आढळतात. आंतरराष्ट्रीय पातळीवरील अँड्र्यू कॉर्नेजीपासून ते भारतातील डॉ. एस.आर. रंगनाथन, ते अगदी प्रत्येक स्थानिक पातळीवर आपणांस ग्रंथालयक्षेत्राच्या विकासासाठी योगदान देणारी एक सबंध साखळीच आढळते.

ग्रंथालयीन क्षेत्राच्या विकासासाठी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, भारतीय ग्रंथालय संघ असे संघटनात्मक योगदान भारतामध्ये सक्रिय आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयांसारख्या संस्थाही ग्रंथालयक्षेत्राच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. विशेषत: ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणामध्ये योग्य ते बदल घडवून या संस्था आपले योगदान देत आहेत. निरंतर शिक्षणाची सुविधा ग्रंथालय सेवकांना उपलब्ध करूनही या संस्था आपले योगदान देत आहेत.

जरी भारतातील विविध व्यक्ती आणि संस्था ग्रंथालयक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असल्या तरीसुद्धा त्यांच्या प्रयत्नांना एक मर्यादा आतापर्यंत येत होती. ती मर्यादा म्हणजे या सर्व प्रयत्नांमध्ये असणारा समन्वयाचा अभाव. समन्वयाच्या अभावामुळे कधी उद्दिष्टे व कार्यांमध्ये द्विरुक्ती होत आहे; तर काही कार्ये दुर्लक्षित राहत आहेत.

राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे (National Knowledge Commission) अध्यक्ष सॅम पित्रोदा व त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षात ही मर्यादा आली आणि ही मर्यादा दूर करण्यासाठी त्यांनी 'राष्ट्रीय ग्रंथालय आयोग' (National Commission on Libraries) स्थापन करण्याची शिफारस माननीय पंतप्रधानांना केली आहे. अशी शिफारस पित्रोदा यांनी त्यांच्या ७ डिसेंबर २००६च्या अहवालाद्वारे केली आहे.



राष्ट्रीय ग्रंथालय आयोगाच्या स्थापनेबरोबरच ग्रंथालयक्षेत्रास प्रोत्साहक ठरणाऱ्या इतरही उपयुक्त शिफारशी सदर आयोगाने केल्या आहेत.

ग्रंथालयक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र आयोग असावा अशी मागणी ग्रंथालय व्यावसायिक गेली ५० वर्षे करत आहेत. कारण वैद्यक, विधी (कायदा) यांसारख्या व्यावसायिक (Professional) क्षेत्रांसाठी शासनाने आयोग स्थापले आहेत. त्या आयोगांचा त्या क्षेत्रांच्या विकासासाठी उपयोगही झालेला आहे.

राष्ट्रीय ग्रंथालय आयोग स्थापण्यासंबंधीची शिफारस मान्य करून माननीय पंतप्रधान ग्रंथालयसेवेचे ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीतील योगदान अधोरेखित करतील अशी आशा व्यक्त करतो. ग्रंथालय व माहितीशास्त्राचे महत्त्व राष्ट्रीय स्तरावर मान्य झाले आहे आणि त्यानुसार ठरणाऱ्या धोरणातून नवा अध्ययनशील समाज निर्माण होण्यासाठी ग्रंथपालन सेवांना महत्त्व प्राप्त होत आहे. आपण सर्वांनी त्याचे स्वागतच करायला हवे.

❑❑❑

# सेमॅन्टिक वेब संकल्पना : भाग – १

डॉ. नागनाथ रा. रामदासी

*माहितीच्या जगड्व्याळ संगणकीय जाळ्यांवर (www) माहितीचे स्वरूप 'प्रस्फोट' अवस्थेच्याही पुढे म्हणजे 'माहितीचे अतिओझे' (Information Overload) अशा स्वरूपात आल्यामुळे अचूक माहितीचा शोध घेणे वेळखाऊ तसेच गुंतागुंतीचे होत आहे. माहिती शोधयंत्राच्या मर्यादा लक्षात घेता Internet-2 किंवा Semantic web असे संकल्पनांधारित प्रकल्प कार्यरत आहेत. १९९१ मध्ये WWW, VRI, HTTP व HTML या नावांचा जनक Tim Berners - Lee याने सेमॅन्टिक वेब ही कल्पना प्रथम मांडली. प्रस्तावित भाग – १मध्ये ही संकल्पना काय आहे, याचा ऊहापोह केला आहे. यापुढील भागात या संकल्पनेच्या अंमलबजावणीबाबत (कार्य कसे करते) विस्ताराने लिहिले जाईल.*

## संगणक विकास व माहिती

संगणकाच्या वापराबरोबर माहिती–तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये आमूलाग्र क्रांती झाली. सुरुवातीस सरकारी कार्यालये, खाजगी संस्था उपयोजनांशी निगडित वापर संगणकांच्या विकसित स्वरूपाबरोबर समाजामधील इतर अनेक क्षेत्रांमध्येही लक्षणीय प्रमाणात वाढला. प्रचंड माहिती साठवणुकीबरोबर जलद माहिती शोधप्रणालींचा उपयोग विविध क्षेत्रांत होऊ लागला. ग्रंथालये, सरकारी कार्यालये, दुकाने, वृत्तपत्रे, ग्रंथप्रकाशन, व्यवस्थापन, प्रशासन, दवाखाने, इत्यादी क्षेत्रांमध्ये माहिती संकलन, संस्करणाबरोबरच, वृत्तांतलेखन, माहिती शोधन, इत्यादी बाबींमध्ये सुलभता आली. १९९०नंतर संगणकाच्या विकसित स्वरूपामध्ये माहिती संचय क्षमता, तसेच वेगवान अशा अतिसूक्ष्म, चिप्स यांबरोबरच



संगणक जोडणी तंत्राची जोड मिळून स्थानिक संगणकीय जाळी तयार झाली. दूरध्वनी व मजकूर प्रसारण तारांच्या (cables) अत्याधुनिक तंत्रज्ञान आविष्काराची जोड लाभल्याने माहितीचे दूरप्रसारण शक्य झाले. उपग्रह तंत्रज्ञानाचाही वाटा यात नाकारता येत नाही. बिनतारी माहिति प्रसारणाचे युग सुरू झाल्यालाही आता अनेक वर्षे झालीत.

दरम्यान साठवणूक माध्यमांची क्षमता वाढून ही अतिशय सुटसुटीत लघू स्वरूपात उपलब्ध झाली. CD ROM, DVD ROM, i-POD ही त्यांची काही उदाहरणे होत. सुरुवातीस केवळ मजकूर लेखन शक्य असलेल्या संगणकामध्ये चित्रे, ध्वनी, चलत्‌चित्रे यांचा वापर अंकीय बहुमाध्यम स्वरूपांत १९९०नंतर सुरू झाला. त्यामुळे माहिती विविध माध्यमांद्वारे (Multimedia) व अनेक रूपांत (formats) उपबल्ध झाली.

## माहिती शोध स्वरूप

या सर्व उपलब्धीमुळे संगणकावरील माहितीचे प्रकाशन व प्रसारण करताना शोध–यंत्रणांची (reserch engines) गरज निर्माण झाली तशी Yahoo, Google, Alta-Vista , इत्यादी शोधयंत्रप्रणाली माहितीच्या जाळ्यांवर माहिती शोधासाठी निर्माण केल्या गेल्या. प्रारंभीच्या काळात संगणक, मुक्त संज्ञा शोध पद्धतीने माहिती उपलब्ध करून देत असल्याने माहिती व्यवस्थापनांमध्ये माहितीच्या पारंपरिक व्यवस्थापनतंत्रांकडे दुर्लक्ष केले गेले. विविध ग्रंथालयांतून अशा पद्धती प्रचलित आहेत. 'वर्गीकरण', 'तालिकीकरण' तर कालौघात बादच होते की काय असे वाटू लागले. तथापि, माहितीच्या संगणकीय जाळ्यांवरील ओघ प्रचंड प्रमाणात वाढला तसा या पारंपरिक माहिती–व्यवस्थापन तंत्रांची गरज जाणवू लागली. कारण माहिती शोध घेण्याचे काम जिकिरीचे झाले. हवी ती माहिती शोधताना वेळ व अचूक माहिती शोधायची तर अशा माहितीचे संगणकीय व्यवस्थापनच पद्धतशीर हवे. या गरजेतून शोधयंत्रणांमध्ये सुधारणा होण्यास सुरुवात झाली. परंतु इतके पुरेसे नाही हे जाणवू लागले तसे 'सेमॅन्टिक वेब' या संकल्पनेची चर्चा सुरू झाली. १९९८–९९ सालानंतर यादृष्टीने वाटचाल सुरू झाली.

## सेमॅन्टिक वेबची संकल्पना

ही संकल्पना तशी नवीन मुळीच नाही. प्रचंड माहितीस्रोतांचे व्यवस्थापन करणारी ग्रंथालये हे त्याचे मूळ साधर्म्य स्वरूप असे म्हणता येईल. ग्रंथालयामधील प्रलेखांच्या व्यवस्थापनामध्ये शोध व स्थान जसे महत्त्वाचे तसेच काहीसे याबाबत म्हणता येईल. शोध व स्थान यासाठी प्रलेख–तालिका व वर्गीकरण यांचा वापर होतो. तसे माहितीच्या जाळ्यांमध्ये प्रलेखांची कल्पना केल्यास विखुरलेल्या मजकूर व माहितीच्या

व्यवस्थापनाची कल्पना करूयात. एक प्रलेख शोध एवढीच मर्यादा न घेता 'मजकूर' किंवा 'विशिष्ट माहिती' शोध अशा प्रकारे तुलना केल्यास या व्यवस्थापनामधील साधारण फरकाची कल्पना यावी. माहितीचे प्रंचड जाळे हे एक ग्रंथालय असे समजून ही कल्पना लक्षात येईल.

'सेमॅन्टिक वेब' हे अस्तित्वातील संगणकीय माहिती जाळ्याचेच सुधारित स्वरूप आहे, असे म्हणता येईल. फक्त अशा सुधारित आवृत्तीमध्ये संगणक जाळ्यावरील माहिती व वापरकर्ता यांच्यामध्ये परस्पर सामंजस्य व सुसंवाद निर्माण होण्यासाठी, माहितीची निश्चितपणे, अर्थपूर्ण पद्धतीने प्रमाणित मांडणीची संरचना केली जाते. दुसऱ्या शब्दांमध्ये असे म्हणता येईल की, भविष्यातील संगणकीय माहितीच्या वाचकांच्या गरजा अधिकाधिक समजावून घेऊन प्रभावी पद्धतीने माहितीचा संगणक जाळ्यामध्ये शोध घेऊन, त्यानुसार योग्य व निवडक तेवढीच माहिती कमी वेळेत संगणक पटलावर मिळेल. सांप्रतच्या अशा जाळ्यांवरील होणाऱ्या प्रलंबित अनुभवावरून याचे महत्त्व लक्षात यावे.

www (World Wide Web) या नावातच शब्दाची जगड्व्याळ व्याप्ती लक्षात येते. हे जगड्व्याळ माहितीचे स्वरूप केवळ संगणकीय जाळ्यांच्या जोडणी शृंखलेतून तयार झाले आहे. 'शब्दातीत दुवा/संदर्भ साखळी' (hypertext link) हे याअंतर्गत माहिती सादरीकरणातील सामर्थ्य आहे. अशा अनेक संदर्भांच्या परस्पर शृंखलेतूनच हे माहिती जाळ्याचे विश्व निर्माण झाले आहे असे हे 'वेब तंत्रज्ञान' किंवा 'माहितीचे जाळे' सब घोडे बारा टके या न्यायाने मजकूर किंवा माहिती-माहितीतील फरक स्पष्ट करण्यासाठी किंवा माहितीच्या गुणवत्ताधारित वर्गीकरणासाठी कमी पडते. त्याला कारणही तसेच आहे. मजकूर व माहितीतील विविधता, अनेक भाषा, विविध विषयांतर्गत त्याचे स्वरूप, त्याच्या सादरीकरणाची बहुमाध्यम पद्धती तसेच विविध रूपे forms, formats या सर्वांसाठी जी विविध प्रमाणके व त्यामधील सुसूत्रता यांसारख्या बाबींचा विचार केल्यास हे स्वाभाविकच आहे. आज संगणकीय जाळ्यांवरील HTML (Hypertext Markup Language) भाषेअंतर्गत केलेली माहितीची गुंफण प्राधान्याने वाचकांच्या गरजेनुसार वाचण्यासाठी उपलब्ध केली गेली आहे. तथापि, संगणकीय प्रणालीमध्ये अर्थपूर्ण पद्धतीने वाचकांच्या गरजांचा विचार करण्याची आवश्यकता यासाठी फारशी विचारात घेतलेली नसते.

संगणकीय जाळ्यांत माहिती पाहण्यासाठी संगणक पटलांवर माहिती (मजकूर) विशिष्ट स्वरूपात, ढाच्यात दिसावी याचा विचार केला जातो. शीर्षक, संदर्भ साखळीसाठीचा दुवा यांचाही विचार यात केला जातो. परंतु निश्चित असा विश्वसनीय मार्ग ज्यामुळे सेमॅन्टिक संरचनेसाठी माहितीचा विचार करता यावा असा हा मार्ग नाही,



हा यातील मोठा अडसर आहे. अर्थात वर विवेचन केल्याप्रमाणे हे सर्व इतके सोपे व सहज नाही तर अनेक गुंतागुंती यामध्ये आहेत. www, URL, HTTP व HTML ही नावे आपणा सर्वांच्या नित्य परिचयाची आहेत. या सर्वांचा जनक टिम बर्नर्स ली (Tim Berners-Lee) याने साधारण १९९९ मध्ये सेमॅन्टिक वेब ही कल्पना प्रथम मांडली. यासाठी World Wide Web Consortium (WSC) या संशोधनसंघांतर्गत संशोधक ही कल्पना साकार करण्याच्या दिशेने कार्यरत आहेत. या कार्याचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे :

(१) अधिकाधिक संगणकीय जाळ्यांना 'सेमॅन्टिक वेब' अंतर्गत समाविष्ट करणे (सेमॅन्टिक वेबवर्धन).

(२) 'सेमॅन्टिक वेब'मध्ये उत्तरोत्तर सुधारणा करणे.

(३) अशा सुधारणांसाठी संगणकीय जाळ्यांवरील उपलब्ध भाषा, विविध भाषांमधील प्रकाशन, तसेच यासाठीच्या साधनांमध्ये (tools) प्रमाणीकरण करणे.

अद्यापही म्हणावे तितके हे कार्य झालेले नाही. तथापि, भविष्यातील याचे महत्त्व नाकारता येणार नाही.

❑❑❑

# कन्सॉरशिया : सहकारी ग्रंथालय व्यवस्था

विजय देवधर

*कन्सॉरशियाची संकल्पना : कन्सॉरशिया ह्या यंत्रणेच्या माध्यमातून ग्रंथालय आणि माहिती-व्यवस्थेतील माहितीचा सहकारी तत्त्वावर वापर केला जातो. कन्सॉरशियाचे प्रकार, फायदे, अडचणी, भारतातील आणि जगातील कन्सॉरशियाचे प्रयास याचा मागोवा, याबाबत या लेखात प्रकाश टाकलेला आहे.*

## प्रस्तावना

माहितीची विपुलता, तिचे निरनिराळ्या प्रकारांतील आणि स्वरूपांतील सादरीकरण, उपभोक्त्यांची त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे लागणाऱ्या माहितीची वाढती मागणी, वेगवेगळ्या स्वरूपांतील सेवांद्वारे दिल्या जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे ग्रंथालयांना चार भिंतींच्या बाहेर पडून वाचकांच्या या न संपणाऱ्या माहितीच्या मागण्या पुरवाव्या लागत आहेत. कोणतेही ग्रंथालय आपल्या वाचकांच्या सर्व मागण्या आपल्या संग्रहातून पूर्ण करू शकत नसल्याने त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागत आहे. याबरोबरच आर्थिक प्रश्नही निगडित आहेत. मर्यादित आणि कमीकमी होत जाणारा अर्थपुरवठा यातून सर्व माहिती विकत घेणे जवळजवळ अशक्यच आहे. याच्या जोडीला वाचनसाहित्याच्या सतत वाढत जाणाऱ्या किमती यामुळे सर्व वाचनसाहित्य विकत घेणे अशक्यच आहे. या प्रश्नाशी निगडित आहे ते अनुदानात सतत होणारी घट आणि वाढते विनिमयदर. यामुळे ग्रंथालयांना एकमेकांच्या सहकार्यानेच यापुढे आपल्या वाचकांच्या मागण्या पुऱ्या कराव्या लागणार आहेत. आणि यातूनच कन्सॉरशिया या संकल्पनेचा उगम झाला आहे. डोळ्यांसमोर उद्दिष्ट आहे ते वाचकांच्या माहितीच्या सर्व गरजा पूर्ण करणे.

शासकीय, खासगी संस्था ज्यांच्याकडे संशोधन आणि विकास विभाग आहे,



त्यांना सतत अद्ययावत माहिती, त्यांच्या सेवांसाठी वा त्यांची उत्पादने बाजारात विक्रीसाठी ठेवण्याकरिता लागत असते. सातत्याने नवनवीन सुधारणा कराव्या लागतात. कारण बाजारात त्यांना त्यांच्या उत्पादनास इतर उत्पादकांशी स्पर्धा करावी लागते. आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी माहितीची गरज सातत्याने लागते. त्यांच्या माहितीच्या गरजेसाठी या संस्था आपल्या ग्रंथालयावर पूर्णपणे विसंबून असतात आणि यासाठी ग्रंथालयांची संघटना हा एक उत्तम उपाय ठरला आहे.

## कन्सॉरशिया म्हणजे काय ?

कन्सॉरशिया म्हणजे घटकांमधील सहकारी तत्त्वावरील व्यवस्था. हे घटक गट, संस्था, संघटना, कार्यालय, सरकारी संस्था, शिक्षण संस्था असू शकतात. कन्सॉरशियाचा समान उद्देश म्हणजे खरेदीची क्षमता वाढविणे, त्यांच्या माहितीस्रोतांची वाढ आणि इतर स्वयंचलित सेवा. थोडक्यात, कन्सॉरशिया म्हणजे अनेक संस्थांचा एक गट ज्यांचा हेतू एकत्रित सहकारी तत्त्वावर माहितीची उपलब्धी आणि आधार, संस्थेच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध क्षमतेहून अधिक प्रमाणात एकत्रितरित्या देणे. कन्सॉरशिया म्हणजे एक औपचारिक संस्था ज्यात दोन वा दोनपेक्षा जास्त सहभागी संस्था एकच हेतू साध्य करण्यासाठी एकत्र येतात. कन्सॉरशिया म्हणजे एक करार. एकत्रित वा गटात आपल्याकडील उपलब्ध वाचनसाहित्यापलीकडे जाऊन इतरांचे माहितीचे स्रोत सहकारी तत्त्वाने वापरणे. यात एकच तालिका, वाचनसाहित्यात भागिदारी, जे एकट्यादुकट्यास शक्य नाही हे अभिप्रेत आहे.

## कन्सॉरशिया का?

कन्सॉरशिया या संकल्पनेचा स्वीकार ग्रंथालयांनी करण्यासाठी अनेक घटक जबाबदार आहेत. त्यांतील महत्त्वाचे घटक आहेत-

### (१) वाचनसाहित्याचा परिस्फोट

वाचनसाहित्याच्या निर्मितीत कल्पनेच्या पलीकडची वाढ झाली आहे. त्यामुळे ग्रंथालयाला केवळ आपल्याच साधनसंपत्तीवर अवलंबून राहणे अशक्य झाले आहे. वाचनसाहित्य अनेक प्रकारे आणि अनेक स्वरूपांत निर्माण होत आहे. यात पुस्तके, मासिके, शोधनिबंध, पुस्तकेतर वाचनसाहित्यातील नियंत्रणाबाहेरील वाढ, ग्रंथालयांना त्यांच्या विषयावर प्रकाशित झालेले आणि उपलब्ध असलेले सर्व वाचनसाहित्य खरेदी करणे अशक्य झाले आहे.

**(२) मर्यादित आर्थिक स्रोत**

मिळणारे अपुरे अनुदान, बदलते विनिमयाचे दर आणि कमीतकमी होणारे मनुष्यबळ यामुळे ग्रंथालयांना कन्सॉरशिया हा एक चांगला पर्याय मिळाला आहे.

**(३) वाचकांच्या विविध मागण्या**

वाचकसंख्येत होणारी वाढ, माहितीशी संपर्क वाचक-वाचकात बदलत आहे. विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके अभ्यासासाठी लागतात; तर वैज्ञानिक, संशोधक व विशेषज्ञ यांना प्रगत स्वरूपातील माहिती अद्ययावत आणि कमीतकमी वेळात हवी असते. एकट्या ग्रंथालयाने त्यांची ही मागणी पूर्ण करणे अशक्यप्राय बनले आहे.

**(४) ग्रंथालयाची पंचसूत्री**

डॉ. रंगनाथन यांची ग्रंथालयाची पंचसूत्री - पुस्तके ही सर्वांसाठी, प्रत्येक वाचकास त्याचे/तिचे पुस्तक, प्रत्येक पुस्तकाला त्याचा वाचक, माहितीचा सहज सुलभ ओघ आणि प्रकाशनांची जागतिक उपलब्धी यामुळे ग्रंथालयांना त्यांच्या वाचकांना हवी असणारी पुस्तके देणे बंधनकारक आहे.

**(५) ग्रंथालय सेवेचे व्यावसायिकीकरण**

हा कन्सॉरशिया निर्मितीतील माहितीच्या भागीदारीकरणासाठी ग्रंथालयसेवेच्या व्यावसायिकीकरणाचा प्रभाव पडला आहे. ग्रंथालयांचे बदलते स्वरूप, वाचनालयांकडून वाचकालयांकडे मार्गक्रमण, माहितीचे वितरण करणारा, माहिती साठविण्यास, माहिती-स्रोतांच्या प्रवेशासाठी मार्गदर्शन यामुळे ग्रंथालय कन्सॉरशियाचे महत्त्व वाढले आहे.

## कन्सॉरशियाचे प्रकार

ज्युली स्टीव्हन्स यांनी कन्सॉरशियाचे पुढील प्रकार त्यांच्या 'सहकारी खरेदी व्यवस्थेचे अर्थशास्त्र' या लेखात केले आहेत.

- **राष्ट्रीय स्तरावरचे** : कन्सॉरशिया हा एक समान प्रकार यात मुख्य उद्देश आहे एका विशिष्ट उत्पादनाचा वापर देशातील सर्व उच्च शिक्षणसंस्थांसाठी करणे.
- **प्रकाशक / संकलक / वितरक** : या ठिकाणी प्रकाशक ग्रंथालयांशी प्रत्यक्ष संपर्क साधतो आणि एकत्रित आलेल्या ग्रंथालयांना विशेष फायदेशीर असे पर्याय देतो.
- **सरकारी मदतीने** : जगातील आंतरराष्ट्रीय स्तरावरचे कन्सॉरशिया सरकारी मदतीने इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्य घेण्यासाठी आर्थिक मदत देऊ केली गेली.



- **खरेदीदारांचे संघ** : ग्रंथालयांनी एकत्र येऊन इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रकाशने मध्यवर्ती चर्चा करून घेणे.

## कन्सॉरशिया स्थापनेची कारणे

कन्सॉरशिया स्थापन करण्यासाठी खालील कारणे माहीत असल्याने गरज निर्माण झाली आहे.

- किमतीत कपात / किमतीत सूट - आकारावर आधारित,
- वाढता संपर्क,
- त्यामुळे काम कमी होणे - माहिती संकलन, प्रायोगिक परवाना आणि किमतीबद्दल वाटाघाटीचा प्रस्ताव,
- सुसह्य किंमत आणि अटी,
- सभासदांची सेवा देण्याची क्षमता ज्यामुळे ते स्थापन, जतन आणि खरेदीसाठी समर्थन.

## भारतातील कन्सॉरशियाचे प्रयोग

भारतामध्ये कन्सॉरशियाचा प्रयोग अजून म्हणावा तसा रुजला नाही. ग्रंथालय-जाळी आणि सहकार्याची सुरुवात भारतात प्रथम निसाटने १९८६ मध्ये कॅलिबनेट-कोलकता आणि १९८८ मध्ये डेलनेट-दिल्ली या ठिकाणी केली. यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने १९८८ मध्ये इन्फ्लिबनेट या प्रकल्पातून विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या जाळ्याची उभारणी केली. या योजनेतून शैक्षणिक संस्थांच्या ग्रंथालयातील मूलभूत सुविधा सुधारण्यावर भर दिला. कारण जाळ्याच्या उभारणीसाठी त्याची प्राथमिकता होती. या सर्व उपक्रमांचा फायदा संस्थाचालक आणि ग्रंथपाल यांची मानसिकता बदलण्यात झाला आणि येथून सुरुवात झाली ती कन्सॉरशियाच्या उभारणीची. सध्या आपल्या इथे पाचसहा कन्सॉरशिया कार्यरत आहेत. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

(१) फोर्सा (फोरम फॉर रिसोर्च शेअरिंग इन अॅस्ट्रोनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स)
(२) सी.एस.आय.आर. (कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च)
(३) आय.जी.सी.ए.आर. (इंदिरा गांधी सेंटर फॉर अॅटॉमिक रिसर्च)
(४) आय.आय.एम. (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट)
(५) आय.एन.डी.इ.एस.टी. (इंडियन नॅशनल डिजिटल लायब्ररी इन इंजीनिअरिंग सायन्स अँड टेक्नॉलॉजी)

(६) युजीसी-इन्फोनेट (भारतातील सर्व विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालये)

(७) एमसीआयटी लायब्ररी कन्सॉरशिया (मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशन अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लायब्ररी कन्सॉरशिया)

**(१) फोर्सा कन्सॉरशिया**

फोरम फॉर रिसोर्च शेअरिंग इन अॅस्ट्रोनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स (फोर्सा) ची संकल्पना १९८१ मध्ये प्रत्यक्षात आली आणि भारतातील पहिले कन्सॉरशिया साकारले गेले. या कन्सॉरशियाचे अकरा सभासद आहेत. हे सभासद अलाहाबाद, नैनिताल, बंगलोर, पुणे, हैदराबाद, कोलकाता आणि मुंबई येथील आहेत. या सर्व संस्था अॅस्ट्रोनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स या विषयाशी संबंधित आहेत. परंतु त्या वेगवेगळ्या प्रकारांत मोडणाऱ्या सरकारी, निमसरकारी, शैक्षणिक स्वायत्त संस्था, विद्यापीठ अशा आहेत.

**(२) सीएसआयआर कन्सॉरशिया**

वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचा (सीएसआयआर) ई-मासिकांचा कन्सॉरशिया ही एक संगणकजाळ्यावर आधारित योजना आहे. परिषदेच्या प्रयोगशाळांच्या ग्रंथालयातील मासिकांची घटती संख्या, निधीची कमतरता आणि विनिमयदरातील वाढ यामुळे दरवर्षी मासिकांच्या संख्येत कपात करावी लागत असल्याने वैज्ञानिकांना पुरेसे संदर्भसाहित्य उपलब्ध करता येत नव्हते. यावरचा एक आर्थिक लाभदायी प्रयत्न आणि मासिकांची घटती संख्या रोखून संशोधकांना जास्तीत जास्त मासिकांची उपलब्धी करून देण्यासाठी, दहाव्या पंचवार्षिक योजनाकाळात कन्सॉरशियाची कल्पना विचाराधीन झाली. निसकेअर ही परिषदेची एक प्रयोगशाळा जी माहितीशास्त्रात काम करते, त्यांच्याकडे कन्सॉरशियाची उभारणी करण्याचे काम सोपविले गेले. या योजनेत सीएसआयआरच्या देशातील ४४ प्रयोगशाळांत संशोधन करणाऱ्या वैज्ञानिकांना शास्त्रीय विषयातील जागतिक दर्जाची ४,५०० मासिके देण्याचे उद्दिष्ट होते. याची प्रत्यक्ष सुरुवात १० जून २००२ ला झाली, तेव्हा सीएसआयआरने मे. एल्झिवेअर सायन्स या प्रकाशन-संस्थेशी करार करून आपल्या वैज्ञानिकांना १,५०० च्यावर शास्त्रीय मासिके उपलब्ध करून दिली. तीन वर्षांच्या काळात ४०० पेक्षा जास्त वर्गणी भरत असलेल्या छापील स्वरूपाच्या मासिकांचा ई-प्रवेशामुळे पंधरापट वापर वाढल्याचे दिसून आले. या पहिल्या प्रयत्नातील यशामुळे मासिकांची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने इतर मान्य प्रकाशकांशी संपर्क साधून एकंदर खर्चाचा अंदाज घेतल्यावर एप्रिल २००४ मध्ये त्यास आर्थिक मंजुरी मिळाली. वाटाघाटी समितीने साठच्यावर प्रकाशकांशी संपर्क साधून त्यांच्याकडून प्रस्ताव आल्यावर मासिकांची गरज आणि निधीची उपलब्धी यानुसार तेरा नव्या प्रकाशकांकडून ३,३०० च्यावर ई-मासिके देशातील ४४ प्रयोगशाळांमधील वैज्ञानिकांना



उपलब्ध करून दिली आहेत. यामुळे वैयक्तिक प्रयोगशाळेतील वैज्ञानिकास झालेला लाभ म्हणजे त्यास २० ते २०० या मर्यादेतच मासिके मिळत होती, त्यांची संख्या आता ४,५००च्या वर झाली आहे. कन्सॉरशियाचा हा आहे दृश्य फायदा. यामुळे मे. एल्झिवेअर आणि त्यांच्या संलग्न असलेल्या इतर प्रकाशकांची प्रकाशित करत असलेली सर्व मासिके या संस्थेच्या वैज्ञानिकांना त्यांच्या संगणकावर उपलब्ध झाली आहेत. यात मासिकांच्या चालू अंकाबरोबरच त्याचे मागील अंकही या वैज्ञानिकांना उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे या ग्रंथालयांची एक मोठी समस्या सुटली आहे ती म्हणजे जागेची वाढीव मागणी, मासिकांसाठी येणारा नंतरचा खर्च. वैज्ञानिकांना त्यांना हव्या असणाऱ्या लेखाची प्रतही उतरवून घेता येते. या प्रयोगाच्या सफलतेमुळे आणि यातील दृश्य फायद्यांमुळे इतरत्रही कन्सॉरशिया या संकल्पनेचा स्वीकार केला गेला आहे. यात पुढील कन्सॉरशिया आहेत.

**(३) इंडेस्ट कन्सॉरशिया**

इंडियन नॅशनल डिजिटल लायब्ररी इन इंजिनीअरिंग सायन्स अँड टेक्नॉलॉजी (इंडेस्ट) या कन्सॉरशियाची स्थापना भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) च्या सहभागाने केली आहे. अडतीस प्रमुख शिक्षणसंस्था ज्यात आयआयटी, आयआयएससी, आयआयएम या महत्त्वाच्या उच्च शिक्षणसंस्थांबरोबर, कौन्सिलच्या आर्थिक मदतीने सहासष्ट अभियांत्रिकी महाविद्यालये सभासद झाली आहेत. या कन्सॉरशियाचे लाभ लक्षात आल्याने ५३ आभियांत्रिकी महाविद्यालये आता सभासद झाली आहेत. या सर्व सदस्यांना आयईएल ऑनलाईन लायब्ररी, एएससीई, एएसएमई, अॅप्लाइड सायन्स अँड टेक्नॉलॉजी प्लस, एसीएम डिजिटल लायब्ररी आणि जेगेटवरील अभियांत्रिकी व तंत्रज्ञानावरील मासिके आता जाळ्यावर उपलब्ध आहेत.

**(४) आयआयएम कन्सॉरशिया**

व्यवस्थापन विषयाच्या अभ्यसाक्रम असणाऱ्या आपल्या देशातील भारतीय व्यवस्थापन संस्थांचे कन्सॉरशिया २००० सालात स्थापन झाले आहे ज्याचा प्रधानहेतू सध्याच्या ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा जास्तीत जास्त वापर, उपयोगाबरोबरच वाचन साहित्याची पद्धतशीर वृद्धी करताना खर्चावर नियंत्रण हा आहे. सध्या जवळजवळ ७०० मासिके जी या क्षेत्रातील नामवंत प्रकाशक प्रकाशित करीत आहेत. ब्लॅकवेल, एल्झिवेअर, कुलवर, टेलर अँड फ्रान्सिस, जॉन वायले, एमसीबी युनिव्हर्सिटी प्रेस या प्रकाशकांची मासिके कन्सॉरशियाच्या सभासदांना मिळत आहेत. हा कन्सॉरशिया इंडेस्ट कन्सॉरशियाचा सभासद असल्याने त्यांच्याकडील मासिकेपण या सभासदांना मिळत आहेत.

**(५) एमसीआयटी लायब्ररी कन्सॉरशिया**

दूरसंचार आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाच्या कन्सॉरशियाची स्थापना नुकतीच झाली आहे. यात मंत्रालयाचे तीन विभाग जे माहिती-तंत्रज्ञान विभाग, दूरसंचार विभाग व डाक विभाग आणि ट्राय (टेलिकॉम रेग्युलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडिया) यांच्या ग्रंथालयांचा हा कन्सॉरशिया या सर्व विभागातील भारतभर असलेल्या कार्यालयांतील अधिकारी आणि सेवकवर्गास माहिती देतो. आयईईई इलेक्ट्रॉनिक लायब्ररी, एसीएम डिजिटल लायब्ररी, बिझिनेस सोर्सेस फ्रॉम इबेस्को, एल्झिवेअरची संगणकशास्त्रावरील प्रकाशने आणि जेसीसी गेटवे. भविष्यकाळात यात वाढ होणार आहे.

**(६) युजिसी इन्फोनेट**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या कन्सॉरशियाची स्थापना २००३ मध्ये झाली आहे. देशातील विद्यापीठांत आणि शैक्षणिक संस्थांत काम करणाऱ्या संशोधकांना ई-मासिके आणि माहिती संचायिकांची उपलब्धी त्यांच्या संशोधनासाठी करून देणे हा हेतू आहे. सध्या विद्यापीठांना उपलब्ध असणारी ही सुविधा लवकरच महाविद्यालयांना पण मिळणार असून भविष्यात इतर संस्थांनाही या सेवेचा लाभ घेता येईल. यातील खर्चाचा भार विद्यापीठ अनुदान आयोग घेणार आहे. कारण विद्यापीठातील ग्रंथालयांना ते मासिकांसाठी अनुदान देतात. गेटवे पोर्टलच्या प्रवेशामुळे दहा हजारांवर मासिके आता या संशोधकांना उपलब्ध झाली आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र, मानव्यशास्त्र या विषयांची मासिके एकाच स्थानावरून मिळाल्याने संशोधकांच्या बहुमूल्य वेळाची बचत होणार आहे.

## कन्सॉरशियाचे फायदे

कन्सॉरशियाच्या स्थापनेमुळे प्रकाशक आणि कन्सॉरशियाचे सभासद यांना अनेक फायदे होणार आहेत.

**(१) प्रकाशकांचे फायदे**

- माहितीचे मोठ्या प्रमाणात वितरण केवळ एकाच बिंदूतून करता येईल.
- वाटाघाटींसाठी केवळ एकच करार.
- एकच देयक.
- गतिमान आणि मोठ्या प्रमाणात बाजारात प्रसिद्धी.
- जास्तीत जास्त वाचक, त्यामुळे जास्तीत जास्त निर्देश आणि त्यामुळे वाढती मागणी.



**(२) सभासदांचे फायदे**

- उच्चतम दर्जाची माहिती.
- वेगवान वितरण.
- किंमत कमी.
- वाचकांना जास्तीत जास्त माहितीस्रोतांची उपलब्धी.
- वाढता इलेक्ट्रॉनिक प्रवेश त्यामुळे सेवकांना मोकळा वेळ; तो ग्रंथालयाच्या इतर कामासाठी वापरता येईल.
- सर्वंकष संग्रह शक्य.
- मध्यवर्ती मासिकांची द्विरुक्ती टाळल्याने अनेक फायदे.

कन्सॉरशियाचे मुख्य फायदे म्हणजे ग्रंथालयातील वाढते सहकार्य, आपल्या विषयातील इतर संस्थांशी निकटचा संपर्क, आपल्याकडील ग्रंथसंपदा समृद्ध करणे. तेही किमान खर्चात, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून दर्जेदार ग्रंथालय सेवा देणे आणि याचबरोबर ग्रंथालयांवर होणाऱ्या खर्चाचा पुरेपूर उपयोग. याशिवाय सभासद ग्रंथालयातील तज्ज्ञ मंडळींच्या ज्ञानाचा उपयोग, व्यावसायिक अडीअडचणींसाठी एक व्यासपीठ, माहितीच्या खरेदीसाठी किमान खर्च, ग्राहकांचे वाढते समाधान कारण वाढता संग्रह. लहान ग्रंथालयांना आपले अनुदान जरी कमी असले तरी जास्तीत जास्त लाभ मिळणार आहे.

## ई-मासिकांच्या साठवणीचा प्रश्न

ई-मासिकांच्या साठवणीच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. यात अनेक मुद्यांचा विचार करावा लागणार आहे. प्रकाशन व्यवसाय हा तसा अस्थिरच आहे. यात संस्था बंद पडणे, संस्थांचे विसर्जन, दुसऱ्या संस्थांमध्ये विलिनीकरण, अशा घटनांमुळे ग्रंथालयांना मासिकांचे मागील अंक पाहण्याची हमी न मिळणे अशांसारख्या काही गंभीर समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. छापील अंकाची वर्गणी असेल तर वर्गणी भरलेल्या काळातील अंकांच्या छापील प्रती ग्रंथालयाकडे असतात. जरी वर्गणी बंद केली असली तरी जोपर्यंत वर्गणीदार होते तोपर्यंतचे अंक त्यांच्याकडे असतात. परंतु अंकीय स्वरूपातील मासिकांच्या वर्गणीबाबत जोपर्यंत आपण वर्गणीदार आहोत तोपर्यंत आपल्याला मागील अंक पाहता येतात. वर्गणी थांबविल्यावर आपली ही सुविधा थांबविली जाते. आपण वर्गणी भरलेल्या काळातील अंकही आपणास उपलब्ध होत नाहीत. संगणकप्रणालीमुळे संपूर्ण अंकही आपल्याकडे उतरवून घेणे याबाबतही मर्यादा घातल्या आहेत. माहिती-तंत्रज्ञानात ज्या वेगाने बदल होत आहेत त्यामुळेही वेळोवेळी अंकीय स्वरूपातील मासिके पाहताना अडचणी येऊ शकतात. माहितीचा अनधिकृत वापर

टाळण्यासाठी 'संकेत शब्द' वा इतर सुरक्षाव्यवस्थेचा वापर करावा लागणार आहे. या गंभीर प्रश्नावर उत्तम मार्ग म्हणजे प्रकाशकांच्या मागील अंकांच्या साठ्यावर अवलंबून न राहता कन्सॉरशियाने आपला स्वत:चा असा मागील अंकांचा साठा निर्माण करावा. त्याप्रमाणे त्यांनी प्रकाशकांशी योग्य प्रकारे वैधानिक असा करार करावा म्हणजे त्यात कोणतीच कायदेशीर अडचण येणार नाही. यासाठी सध्या असणाऱ्या सर्व कन्सॉरशियांनी एकत्र येऊन या प्रश्नातून कसा मार्ग काढावा यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत म्हणजे यापुढील काळात येणाऱ्या नव्या कन्सॉरशियांना ते मार्गदर्शक ठरेल. कन्सॉरशियाचे काम उत्तम प्रकारे चालण्यासाठी कन्सॉरशियाच्या सभासदातील संपूर्ण सहकार्य, तसेच कन्सॉरशियाच्या मुख्यालयाशी सततचा संपर्क, पारदर्शक तत्त्वे, कार्याचा क्रमवारी समस्या, अडचणी आणि प्रश्नांबाबत मार्गदर्शन, उपाययोजना त्याचा वापर केल्यास या प्रयोगास सफलता मिळणार आहे. विषयाधिष्ठित कन्सॉरशियाचाही विचार व्हावा. सध्या त्याप्रमाणे काही कन्सॉरशिया आहेत. भविष्यकाळात कृषी, वैद्यकीयशास्त्र, सामाजिकशास्त्रे, इत्यादी विषयांची कन्सॉरशिया विकसित व्हावीत या दिशेने ग्रंथालये आणि ग्रंथपाल यांना एकत्रितपणे काम करावे लागणार आहे. राष्ट्रीय स्तरावर या विषयावर एखादे चर्चासत्र  आयोजित केल्यास चांगली उपयुक्त माहिती एकत्र होईल व त्याचा यापुढील कन्सॉरशियांना निश्चितच लाभ होईल.

## संदर्भसूची


(१) राजगोली (इक्बाल अहमद यु.), बिर्डाय (ख्रिस्तिना), करिसिदप्पा (सी.के.), 'युझ ऑफ इन्फॉर्मेशन रिसोर्सेस थ्रु कन्सॉरशिया मोड इन इंडियन लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सेंटर्स : ए केस स्टडी ऑफ फोर्सा कन्सॉरशियम,' *एसआयइएलएस जर्नल ऑफ इन्फॉरमेशन मॅनेजमेंट* खंड ४३, अंक १, मार्च २००६, पा. ३७–४९.

(२) स्टिव्हन्स (जे), 'द इकॉनॉमिक्स ऑफ कोलॅबोरेटिव्ह परचेसिंग प्रॅक्टिसेस'.

(३) बावाकुट्टी एम. आणि अब्दुल अझिज टी.ए., 'लायब्ररी कन्सॉरशिया इन इंडिया : इनिशिएटिव्ह अँड कन्सर्न्स,' *एसआरइएलएस जर्नल ऑफ इन्फॉरमेशन मॅनेजमेंट* खंड ४३, अंक २, जून २००६. १७७–१८४.


❑❑❑



# डिजिटायझेशन कार्यातील विविध घटकांच्या जबाबदाऱ्या व योगदान


डॉ. राजेंद्र कुंभार



*ग्रंथालयातील वाचनसाहित्याचे डिजिटायझेशन करण्यासंबंधात ग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीशास्त्र प्रशाला/विभाग आणि ग्रंथालय संघटना/संघ विविध जबाबदाऱ्या निभावू शकतात. विविध प्रकारे योगदान देऊ शकतात. हे तीनही घटक डिजिटायझेशन कार्यात कोणत्या जबाबदाऱ्या निभावू शकतात, कोणते योगदान देऊ शकतात ? याचे विवेचन सदर लेखात केलेले आहे.*


## प्रस्तावना

ज्ञान ग्रंथरूपात संग्रहित करण्याची कला/क्षमता मानवाने शेकडो वर्षांपूर्वी साध्य केली. ही क्षमता म्हणजे मानवी ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेतील मैलाचा दगड होता; एक अत्यंत महत्त्वाची बाब होती. पुढे मुद्रणकलेचा शोध लागला आणि ग्रंथ हे ज्ञान साठविण्याचे प्रभावी माध्यम झाले. परंतु ग्रंथ या माध्यमाला काही मर्यादा पुढील काळात दिसू लागल्या. उदाहरणार्थ, मुद्रित ग्रंथात ज्ञान कागदावर छापलेले असते. वातावरणातील घटकांमुळे आणि आम्लीकरण प्रक्रियेमुळे (Acidification process) कागद हळूहळू खराब होऊ लागतो. त्यामुळे कागद स्वरूपातील ग्रंथाचे जीवनमान मर्यादित होते. अशा परिस्थितीत मुद्रित वाचनसाहित्याचे जतन करण्याचा एक प्रभावी मार्ग म्हणून डिजिटायझेशनचा विचार केला जातो.

डिजिटायझेशन करण्याचे दुसरे कारण म्हणजे मुक्त संहिता शोध (free text search) सुविधा. मुद्रित वाचनसाहित्यातून मुक्त संहिता शोधपद्धतीने माहिती शोधणे

शक्य होत नाही. मुद्रित वाचनसाहित्य एका ठिकाणाहून दुसरीकडे (उदाहरणार्थ, अंतर-ग्रंथालयीन देवघेवीसाठी) पाठविण्यासाठी (CD स्वरूपातील वाचनसाहित्यापेक्षा) जास्त खर्च येतो. तसेच मुद्रित वाचनसाहित्य साठविण्यासाठी डिजिटाइज्ड (इलेक्ट्रानिक स्वरूपातील / डिजिटल स्वरूपातील) वाचनसाहित्यापेक्षा खूप जास्त जागा आवश्यक असते.

वरील परिच्छेदांमध्ये नमूद केलेल्या व इतर संबंधित अडचणींवर मात करण्यासाठी अनेक ग्रंथालये त्यांच्याकडे असलेल्या मुद्रित वाचनसाहित्याचे डिजिटायझेशन करत आहेत; करण्याचा विचार करत आहेत.

## डिजिटायझेशन म्हणजे काय ?

मुद्रित वाचनसाहित्याचे डिजिटल स्वरूपात रूपांतर करणे म्हणजे डिजिटायझेशन. यामध्ये -

(१) मुद्रित वाचनसाहित्य स्कॅन करणे,
(२) स्कॅन केलेल्या इमेज फाईलमधील माहितीचे ऑप्टिकल कॅरेक्टर रेकग्निशन (OCR) आज्ञावलीच्या साहाय्याने टेक्स्ट फाईलामध्ये रूपांतर करणे,
(३) टेक्स्ट फाईलमधील परिच्छेदांना शीर्षके देणे,
(४) या शीर्षकांचे हायपर लिंकिंग करणे, इत्यादी प्रक्रियांना एकत्रितपणे डिजिटायझेशन असे म्हणतात.

## डिजिटायझेशन कार्याची वैशिष्ट्ये

डिजिटायझेशन प्रक्रियेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील :

(१) तांत्रिक उपकरणाची आवश्यकता. जसे, संगणक, स्कॅनर, ओसीआर आज्ञावली, इत्यादी,
(२) मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक आवश्यक,
(३) तांत्रिक बाबींचे ज्ञान आवश्यक,
(४) वेळ घेणारी प्रक्रिया,
(५) अनेक बाबींसंबंधी निर्णय घ्यावे लागतात,
(६) अनेक दृष्टीने उपयुक्त,

वरील वैशिष्ट्ये विचारात घेऊन डिजिटायझेशन पूर्णत्वास नेण्यामध्ये व्यक्ती, संस्था आणि संघटनांची भूमिका महत्त्वाची ठरते. विशेषत: ग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग/प्रशाला आणि ग्रंथालय संघटना डिजिटायझेशन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.



## (अ) डिजिटायझेशन प्रक्रियेतील ग्रंथपालाची भूमिका

केनी आणि रायजर (२०००) यांनी सांगितल्यानुसार डिजिटायझेशन प्रक्रिये-दरम्यान अनेक निर्णय घ्यावे लागतात. विशेषत: ग्रंथपालास या प्रक्रियेमध्ये पुढील अनेक बाबतींत निर्णय घ्यावे लागतात; विविध भूमिका निभावाव्या लागतात.

### (१) बदलाचे व्यवस्थापन

डिजिटायझेशन प्रक्रियेदरम्यान आणि डिजिटायझेशननंतरसुद्धा ग्रंथालयामध्ये अनेक दूरगामी बदल करावे लागतात. उदाहरणार्थ, डिजिटल वाचनसाहित्याचे वर्गीकरण, देखभाल, त्यातील माहिती शोधण्यासाठी नवीन तंत्रे आत्मसात करणे, डिजिटल वाचनसाहित्य वापरण्याबाबत वाचकांची मानसिक तयारी करून घेणे, इत्यादी. थोडक्यात, डिजिटल स्वरूपातील वाचनसाहित्याची देखभाल व वापर याबाबत ग्रंथालय सेवक आणि वाचकांची मानसिक तयारी करणे हे ग्रंथपालाचे नेतृत्व कार्य आहे. डिजिटायझेशमुळे ग्रंथालयाच्या तांत्रिक, आर्थिक, कार्यात्मक क्षेत्रात होणाऱ्या बदलाचे व्यवस्थापन ग्रंथपालाने केले पाहीजे.

### (२) डिजिटायझेशन कोणी करावे याबाबत निर्णय घेणे

ग्रंथालयाकडे उपलब्ध असलेल्या सेवकांच्या मदतीने ग्रंथालयीन वाचनसाहित्याचे डिजिटायझेशन करणे शक्य आहे. त्यासाठी ग्रंथालयास आवश्यक ती यंत्रसामग्री (संगणक, स्कॅनर, इत्यादी) व आज्ञावली खरेदी करावे लागते. तज्ज्ञ सेवकवर्ग आवश्यक असतो.

डिजिटायझेशनसाठी उपलब्ध असलेला दुसरा मार्ग म्हणजे 'आऊटसोर्सिंग'. म्हणजेच ग्रंथालयाबाहेरील संस्थेकडून ग्रंथालयीन वाचनसाहित्याचे डिजिटायझेशन करून घेणे.

डिजिटायझेशन करून घेण्याच्या वरील दोन्ही पद्धतींचे फायदे व तोटे आहेत. म्हणून दोन्ही पद्धतींच्या फायद्या-तोट्यांचा अभ्यास करून दोन्हींपैकी कोणत्या पद्धतीने डिजिटायझेशन करावयाचे हे ग्रंथपालास निश्चित करावे लागेल.

### (३) डिजिटायझेशनसाठी तांत्रिक व मनुष्यबळ सुविधा उपलब्ध करणे

डिजिटायझेशन करण्यासाठी तसेच डिजिटाइज्ड वाचनसाहित्य वापरण्याकरिता संगणकादी सुविधा आवश्यक असतात. या सुविधा ग्रंथपालाने उपलब्ध केल्या पाहिजेत. तसेच डिजिटायझेशन करण्याकरिता आणि डिजिटल स्वरूपातील वाचनसाहित्याची देखभाल व वापर करण्याकरिता प्रशिक्षित सेवकवर्ग आवश्यक असतो. ग्रंथालयात नवीन सेवकवर्ग नेमताना अशी क्षमता असलेला सेवकवर्ग नेमण्यासाठी ग्रंथपालाने जागृत असावे. तसेच ग्रंथालयातील सेवकांना डिजिटायझेशनसंबंधीच्या कार्यशाळा, लघू मुदतीचे

प्रशिक्षणवर्ग या प्रकारच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून घ्यावी. असे प्रशिक्षण घेण्याची संधी द्यावी.

**(४) कोणते वाचनसाहित्य डिजिटाइज करावे याबाबत निर्णय घेणे**

डिजिटायझेशन ही एक खर्चीक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेसाठी वेळही खूप लागतो. ग्रंथालयातील सर्वच वाचनसाहित्याचे डिजिटायझेशन एकाच वेळेस केले पाहिजे असेही नाही. वरील बाबी विचारात घेता ग्रंथपालास डिजिटायझेशन करावयाच्या वाचनसाहित्याची निवड करावी लागेल. डिजिटायझेशनसाठी वाचनसाहित्याची निवड करताना वाचनसाहित्याचे प्रकाशन वर्ष (म्हणजेच वय), शारीरिक स्थिती, वापराचे प्रमाण, वाचकांची मागणी, इत्यादी अनेक विषय विचारात घ्यावेत.

**(५) कॉपीराईटबाबत दक्षता घेणे**

डिजिटायझेशन प्रक्रियेत मुद्रित वाचनसाहित्याचे (हार्ड कॉपी) डिजिटल स्वरूपात (सॉफ्ट कॉपी) रूपांतर केले जाते. यामध्ये मूळ वाचनसाहित्याच्या कॉपीराईटबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतो. म्हणून ग्रंथपालाने डिजिटायझेशनसाठी निवडलेल्या वाचनसाहित्याच्या कॉपीराईटचे उल्लंघन होऊ नये याबाबत दक्षता घ्यावी.

**(६) उपभोक्ता प्रशिक्षण**

डिजिटायझेशन प्रक्रियेतून डिजिटल वाचनसाहित्य तयार होते. डिजिटल वाचनसाहित्यातून आवश्यक ती माहिती कशी शोधावी, या वाचनसाहित्याचा वापर कसा करावा याबाबत ग्रंथालयाचे उपभोक्ते परिचित असतीलच असे नाही. म्हणून पिलस्टन आणि हार्ट (२००२) यांच्या संशोधनाधारित निकषांनुसार ग्रंथालयीन उपभोक्त्यांना डिजिटल वाचनसाहित्याच्या वापराबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. डिजिटायझेशन करू इच्छिणाऱ्या / केलेल्या ग्रंथालयाने उपभोक्ता प्रशिक्षण उपक्रम आयोजित केले पाहिजेत.

**(७) सहकारी तत्त्वाचे उपयोजन**

डिजिटायझेशन करण्यासाठी सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते. सहकार, भागीदारी (Partnership), कन्सॉरशिया या मार्गाने आर्थिक गरजांचा तणाव काही प्रमाणात कमी करता येईल. विशेषत: डिजिटायझेशन तंत्रज्ञानाचा सहकारी तत्त्वावर वापर करता येईल का या दृष्टीने ग्रंथपालाने विचार केला पाहिजे. ग्रंथालयीन नेटवर्कद्वारे डिजिटल तंत्रज्ञानाचा आणि डिजिटल वाचनसाहित्याचा सहउपयोग (sharing) करणे शक्य आहे. यासाठी ग्रंथपालाने विशेष ग्रंथालये, ग्रंथालयाचे वाचनसाहित्याचे सामर्थ्य (strength of collection) यानुसार डिजिटायझेशनसाठी ग्रंथालयांमध्ये सहकार स्थापन करण्यासाठी पुढाकार घ्यावा.



**(८) डिजिटल वाचनसाहित्याचा प्रसार**

दुर्मीळ मुद्रित वाचनसाहित्याचे जतन करणे हा डिजिटायझेशनचा प्रमुख उद्देश असतो. त्याचबरोबर वाचनसाहित्याचा पर्यायाने ग्रंथालयाचा वापर वाढविणे हाही डिजिटायझेशनचा उद्देश आहे. ग्रंथालयातील डिजिटल वाचनसाहित्याचा जास्तीत जास्त वापर व्हावा, वापर वाढावा यासाठी ग्रंथपालाने विविध प्रसिद्धी उपक्रम आयोजित केले पाहिजेत. प्रदर्शन, प्रात्याक्षिके यांद्वारे ग्रंथपाल डिजिटल वाचनसाहित्याबाबत उपभोक्त्यांमध्ये प्रसार, जागरुकता निर्माण करू शकतात.

**(९) डिजिटायझेशन खर्चाची मोजदाद व वसुली**

मुद्रित वाचनसाहित्याचे डिजिटायझेशन करण्यासाठी मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागते. डिजिटायझेशनसाठी विशेषत: संगणक, आज्ञावली, मनुष्यबळ आणि देखभाल यासाठी निधी आवश्यक असतो. वरील कारणांसाठी किती निधी आवश्यक आहे हे ग्रंथपालास ठरविता आले पाहिजे. तसेच डिजिटल वाचनसाहित्याचे विपणन करून डिजिटायझेशनसाठी केलेल्या काही खर्चाची तरी वसुली करता आली पाहिजे.

**(१०) डिजिटल जतन/संरक्षण** (Digital Preservation)

माहिती दळणवळण तंत्रामध्ये वेगाने बदल होतात. नवनवीन माहिती-तंत्रज्ञानाचा सातत्याने शोध व उपयोजन केले जाते. पर्यायाने ग्रंथालयाकडील डिजिटल तंत्रज्ञान वेगाने जुने होते / निरुपयोगी होते. यावर उपाय म्हणून ग्रंथपालांनी डिजिटल जतन/संरक्षण करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान जतन करून तसेच डिजिटल वाचनसाहित्याचे माध्यमांतर (Data Migration) करून डिजिटल जतन/संरक्षण करणे शक्य आहे.

## डिजिटायझेशन प्रक्रियेत ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग/ प्रशालांची भूमिका

डिजिटल आणि नेटवर्कमय ग्रंथालयात कार्य करण्यासाठी सक्षम मनुष्यबळाची आवश्यकता असते. असे मनुष्यबळ तयार करण्याची जबाबदारी ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणसंस्थांची असते. मुद्रित वाचनसाहित्याचे डिजिटायझेशन करणे, डिजिटल, वाचनसाहित्यामधून माहिती शोधणे, तिचे मूल्यमापन व वितरण, इत्यादी कार्ये. ग्रंथालय व माहितीशास्त्र प्रशिक्षित व्यक्तीला करता आली पाहिजेत. ग्रंथालय व माहितीशास्त्र प्रशिक्षणार्थींमध्ये अशी क्षमता निर्माण करण्यासाठी ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण-संस्थांनी पुढील दोन कार्ये करणे आवश्यक आहे.

### (१) योग्य असा अभ्यासक्रम विकसित करणे

ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणसंस्थांनी डिजिटायझेशन व डिजिटल वाचनसाहित्याच्या व्यवस्थापनासाठी कोणती कौशल्ये आवश्यक आहेत त्याचा शोध घ्यावा. उदाहरणार्थ, टेनंट (२००२) यांनी त्यांच्या 'Digital Librarian Shortage' या लेखात अशा कौशल्यांची यादी दिली आहे. अभ्यासक्रमामध्ये डिजिटायझेशनसंबंधी आशय समाविष्ट करण्यासाठी या यादीचा उपयोग होऊ शकतो. अभ्यासक्रमामध्ये अशा सुधारणा करताना प्रत्यक्ष डिजिटल ग्रंथालयात कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांचे मार्गदर्शनही मोलाचे ठरते (Roes, 2001).

भारतातील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Curriculum Development Committee (2001) ने सुधारित अभ्यसाक्रम तयार केला आहे. डिजिटल ग्रंथालयासाठी योग्य असे मनुष्यबळ उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सदर अभ्यासक्रमात आवश्यक ते घटक जाणीवपूर्वक समाविष्ट करण्यात आले आहेत. माहिती-तंत्रज्ञान, डिजिटायझेशन, डिजिटल ग्रंथालये - स्वरूप व सेवा, यांसारखे घटक सुधारित अभ्यासक्रमात समाविष्ट केलेले आहेत. या घटकांची तात्त्विक व प्रात्यक्षिक बाबींची व्यापकता, सखोलता वाढवली आहे. या विषयाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या विषयासाठीचे अभ्यासक्रमातील गुण २०० वरून ४०० पर्यंत वाढविले आहेत.

### (२) अभ्यासक्रमाची अंमलबजावणी

डिजिटायझेशन व तत्संबंधित बाबींचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी ग्रंथालय व माहिती संस्थांनी सक्षम अध्यापक वर्ग उपलब्ध करावा. आवश्यकतेनुसार सुरुवातीला माहिती-तंत्रज्ञान उद्योगातील/ क्षेत्रातील तज्ज्ञांची अध्यापनासाठी मदत घ्यावी. अध्यापनामध्ये जास्तीत जास्त भर प्रशिक्षणावर द्यावा. ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण संस्थांनी आवश्यकतेनुसार अल्पावधीचे डिजिटायझेशनसंबंधित अभ्यासक्रम विकसित करावेत व राबवावेत.

## डिजिटायझेशन कार्यातील ग्रंथालय संघांची भूमिका

ग्रंथालयातील वाचनसाहित्याचे डिजिटायझेशन करण्यासंबंधात ग्रंथालय संघ (Library Associations) पुढील प्रकारची भूमिका बजावू शकतात.

### (१) प्रशिक्षण

डिजिटायझेशनसंबंधीचे अल्पावधीचे अभ्यासक्रम विकसित करून ते ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणसंस्थांमार्फत राबविण्यासाठी ग्रंथालय संघ मदत करू शकतात;



प्रोत्साहन देऊ शकतात. विद्यापीठ अनुदान आयोग, भारत सरकारचा विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, CSIR यांसारख्या संस्थांच्या मदतीने ग्रंथालय संघ डिजिटायझेशनसाठी ग्रंथालयांना अनुदान व मार्गदर्शन उपलब्ध करू शकतात. भारतीय ग्रंथालयांमध्ये संगणकाचा उपयोग वाढावा यासाठी अशी भूमिका भारतीय ग्रंथालय संघाने (ICA) १९९०च्या दशकात बजावली होती.

### (२) प्रमाणके विकसित करणे

डिजिटायझेशन, डिजिटल माहितीचे व्यवस्थापन, वितरण, इत्यादीसंबंधीची कार्ये सुलभ होण्यासाठी विविध प्रकारची प्रमाणके (Standards) आवश्यक असतात. जसे- सध्या अस्तित्वात असलेली MARC21, Dublin Core Elements, इत्यादी. डिजिटायझेशनसंबंधी आणखी प्रमाणकांची आवश्यकता आहे. ती विकसित करण्यामध्ये ग्रंथालय संघ सक्रिय भूमिका बजावू शकतात.

### (३) बदल स्वीकारण्यासाठी नेतृत्व करणे

सर्वसाधारण मानवी प्रवृत्ती बदलास विरोध करणारी असते. डिजिटायझेशन म्हणजे बदल येतोच. ग्रंथालय व माहिती व्यवसायिकांनी बदल स्वीकारावा यासाठी दूरदृष्टी असलेल्या तज्ज्ञांची व्याख्याने, प्रकाशने, यांद्वारे ग्रंथालय संघ प्रयत्न करू शकतात. सभा, संमेलने, चर्चासत्रे, कार्यशाळा यांद्वारे डिजिटायझेशनबद्दलची जागरूकता निर्माण करण्यामध्ये ग्रंथालय संघ नेतृत्वाची भूमिका निभावू शकतात.

### (४) वाचनसाहित्य प्रकाशित करणे

डिजिटायझेशनशी संबंधित वाचनसाहित्य ग्रंथालय संघाने मुद्रित तसेच डिजिटल स्वरूपात प्रकाशित करावे. यामध्ये डिजिटायझेशन संबंधित केस स्टडीज, हस्तपुस्तिका (Handbooks, Manuals), डिजिटायझेशनसाठी निधी व मार्गदर्शन देणाऱ्या संस्था व व्यक्तींच्या निर्देशिका (Directories), इत्यादी प्रकारच्या प्रकाशनांचा समावेश करावा.

## समारोप

डिजिटायझेशन हे नवीन तंत्रज्ञानाने २१व्या शतकातील ग्रंथालयांना उपलब्ध केलेली एक संधी आहे. मर्यादित प्रमाणात डिजिटायझेशन आवश्यकही आहे. या संधीचा ग्रंथालयांना योग्य उपयोग करता यावा यासाठी ग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण संस्था, आणि ग्रंथालय संघ निश्चितपणे महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

## संदर्भ

(1) Kenney, A. R. and Rieger, O. Y. (2000). Moving theory into Practice. California, Research Library Group.

(2) Pilston, A. K. and Hart, R. L. (2002). Students Response to New Electronic Reserves System. Journal of Academic Librarianship 28 (3) : 147-151.

(3) Roes, H (2001), Digital Libraries and Education : Trends and Opportunities, D-Lib Magazine 7(7/8) July/August. Also available at http://www.dlib.org/dlib/julyol/roes/07roes.html.

(4) Tennant, R. (2002), Digital Librarian Shortage, Library Journal, 15th March.

(5) UGC. Curriculum Development Committee (2001). Chairman : C. R. Karrisiddappa. Model Curriculum of Library and information Science, New Delhi, UGC.

❑❑❑



# ग्रंथालयांच्या अनुदान प्रारंभाचे आठशेव्या वर्षात पदार्पण

डॉ. प्रदीप कर्णिक

महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची अनुदान संस्कृती नेहमी कुठल्या ना कुठल्या कारणाने चर्चेत असते. कधी अनुदान वाढवण्याच्यामुळे तर कधी अनुदान बंद करून सरकारने कर्मचाऱ्यांचे वेतन द्यावे या मागणीमुळे, तर कधी शाळा-महाविद्यालयांप्रमाणे १००% अनुदान मिळावे यामुळे. या मागण्यांमुळे जनतेला अशी सार्वजनिक ग्रंथालये महाराष्ट्रात आहेत याचे भान येते. सरकारलाही अशी ग्रंथालये महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक घटक आहेत याची अधूनमधून जाणीव होते हे याचे फलित. या मागण्यांमुळे सरकारचे 'ग्रंथालय संचालनालय' नावाचे एक खाते आहे याचीही माहिती जनतेला याचमुळे होते हेही नसे थोडके !

सध्या 'ग्रंथालय संचालनालय'च मोठ्या चर्चेत येऊन गेले. संचालकांच्या हातात अनुदाने देणे, नवीन ग्रंथालयांना संमती देणे, पुस्तकांची एकगठ्ठा खरेदी करणे, इमारत बांधकाम, ग्रंथ संरक्षण निधी, इत्यादी अनेक बाबी असतात. चर्चासत्रांवर होणारा खर्च, हिशेब तपासणे, प्रवासखर्च, इत्यादींसाठीही बराच पैसा खर्च करण्याची मुभा असते. 'अनुदान संस्कृती'चा मोठा स्रोत या खात्यातून ग्रंथालयाकडे जातो.

मराठी मातीतली ही अनुदान संस्कृती किती जुनी आहे ? लिखित स्वरूपाचा पुरावा कोणता ? याचा धांडोळा घेण्याच्या प्रयत्नात एक छानशी माहिती हाती आली.

मराठी भाषेतला हा जो लिखित ज्ञात पहिला पुरावा आहे तो यंदाच्या वर्षात नेमका ८००व्या वर्षात पदार्पण करीत आहे. इतकी जुनी व तीही नेमकी ग्रंथालयाच्याच संदर्भातली 'दान' संस्कृती आहे.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे थोर कल्पक व्यासंगी इतिहासकार कै. वि. ल. भावे यांचा 'महाराष्ट्र सारस्वत' हा ग्रंथ विख्यात आहे. या ग्रंथालाही एक मोठी परंपरा आहे. १८९८ साली प्रथम भावे यांनी एक छोटेखानी वाङ्मयाच्या इतिहासाचा निबंध प्रकाशित केला. १९९८ साली ठाण्यात या कार्याची शताब्दीही साजरी झाली होती. त्या ग्रंथाच्या सुधारित आवृत्त्या स्वत: भावे यांनीच तयार केल्या होत्या. मात्र या ग्रंथाचे भाग्य असे, की या ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीचे संपादन थोर संशोधक डॉ. शं. गो. तुळपुळे

यांनी १९६३ साली केले व त्यामध्ये डॉ. तुळपुळे यांनी १९६३ पर्यंतच्या संशोधनाची दखल घेऊन पुरवणी खंड तयार केला. १९८३ साली जेव्हा त्याची सहावी आवृत्ती निघाली तेव्हा डॉ. तुळपुळे यांनी १९७५ पर्यंतच्या वाङ्मयीन संशोधनाची भर त्या पुरवणीत घातली. प्रस्तुत पुरवणीसारख्या संशोधकीय माहितीची जोड मिळणारा वाङ्मयाचा इतिहासही मराठीतला एकमेव असावा असे वाटते. पॉप्युलर प्रकाशनाने हे दोन खंड प्रकाशित केले आहेत.

योगायोगाचा भाग असा की याच वि. ल. भावे यांनी ठाण्याच्या काही मित्रांच्या मदतीने मराठीतले पहिले सार्वजनिक ग्रंथालय १८९५ साली स्थापन केले. त्यांच्या या कार्यातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात ठिकठिकाणी मराठी ग्रंथालये स्थापन झाली आणि सार्वजनिक ग्रंथालयांची चळवळ महाराष्ट्रात उभी राहिली. १९६७ साली महाराष्ट्र शासनाने 'सार्वजनिक ग्रंथालय कायदा' संमत केला व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांना अ, ब, क, आणि ड या दर्जाप्रमाणे अनुदाने मिळू लागली. अनुदाने देणे, त्यांचा हिशेब तपासणे, नवीन ग्रंथालये स्थापन करणे, प्रोत्साहन देणे या सर्व कार्यासाठी ग्रंथालय संचालनालयाची शासनाने निर्मिती केली व या नवीन संचालनालयाचे पहिले संचालक झाले कृ. द. पुराणिक. किती छान योजना, केवढा चांगला विचार यामागे होता आणि अजूनही काही प्रमाणात आहे.

वि. ल. भावे यांनी 'मराठी भाषेची मूळपीठिका' तपासत अनेक शिलालेखांचा, ताम्रपटांचा आधार घेत घेत ते मागे मागे गेले आहेत. नेमकी मराठी भाषा केव्हा वापरात आली, लिखित स्वरूप कसे होते, बोली स्वरूप कसे होते याबद्दल त्यांनी विलक्षण मेहनत घेऊन पुरावे देण्याचा प्रयत्न केला आहे. मुळातून तो खरं म्हणजे वाचायला हवा. याच पुराव्यांमध्ये त्यांनी शके ११३०च्या सुमाराचा एक शिलालेख, पाटणचा शिलालेख, दिला तर आहेच; पण त्यावर भाष्यही केले आहे. या शिलालेखचा जिथे उल्लेख आहे तिथे एक टीपही आहे. त्यात 'याचा काळ शके ११२९ असा आहे' असे नमूदही केले आहे. पुरवणीकार डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या मते, शके ११२९ हा काळ शिलालेखाचा नसून त्यामध्ये जो 'दाना'चा उल्लेख आहे, ते दान देण्याचा तो काळ आहे असे म्हटले आहे. त्यांच्या मते, हा शिलालेख शके ११३२ चा ठरतो. काळाबद्दलचा हा शिलालेख शके ११३० की ११३२ याबद्दल आहे. म्हणजे त्यावरील अक्षरे कोरण्याबद्दल आहे. 'दाना'चा काळ मात्र शके ११२९ च आहे असे दिसते. याचा अर्थ इ.स. १२०७ हे वर्ष येते. याचा अर्थ या दानाच्या घटनेने यावर्षीचे ८००व्या वर्षात पदार्पण केले आहे.

या शिलालेखावर एकूण २६ ओळी आहेत. त्यांपैकी पहिल्या २१ ओळी संस्कृत भाषेत असून शेवटच्या पाच ओळी मराठी भाषेत आहेत. त्या ओळींचे त्या काळाचे मराठी रूप व आजच्या भाषेत होणारा त्यांचा अर्थ अशी दोन्ही रूपे भावे यांनी शिलालेखाच्या मूळ ठशासह पुस्तकात समाविष्ट केली आहेत. त्या काळातले मराठी



रूप वाचले तर काही अर्थबोध होईलच असे नाही. परंतु त्यांचा आजच्या मराठीतला तर्जुमा मात्र विचार करायला लावेल असा आहे. तो असा :

२१. श्री शके ११२८ मध्ये प्रभव–सवंत्सरी श्रावण महिन्यांत पौर्णिमेचे तिथीस चंद्रग्रहण समयी श्री सोहदेवाने सर्वजनांसमस हस्तोदकपूर्वक आपल्या गुरुने स्थापिलेल्या मठास

२२. दिले ते असे की ।। या पाटणांत जे द्रव्य उत्पन्न होईल (मालाच्या विक्रीचा कर येईल) त्यावरील राजाने घ्यावया जो कर (आसिआउ) तो मठास दिला । माल विकणाऱ्यापासून जे ब्रह्मोत्तर घ्यावयाचे तेंहि ब्राह्मणांनी मठास दिले । गिऱ्हा –

२३. इकांपासून, म्हणजे माल घेणाऱ्यांपासून, दर आसूमागे दामाचा विसावा भाग नगराने (घ्यावयाचा तो नगरात मठास दिला। पाण्याचे बैल तयार ठेवावे नांगरास जुंपलेल्या बैलाच्या श्रमाने सिद्ध होणाऱ्या वरीच्या विक्रीच्या प्रत्येक आसूमागे.... ।। (नगरांतल्या बाजारा) बाहेरल्या दर घोड्यामागे (आसू = सोन्याचे नाणे उदा. चौधरी आसू)

२४. पहिल्या घाण्याला (तेलाच्या) घाण्याची (एक) लोटी मठाला दिली. नंतर जितके घाणे निघतील तितक्या प्रत्येकाबद्दल (एक–एक) पळी पळी तेल ।। एथें जे मापावयाचें ते मठाच्या मापानें मापावें. मापाऊ म्हणजे (मापण्याबद्दल व मापपात्राबद्दलचे घेणें तें) अर्धे मठाचे व अर्धे

२५. मापाऱ्याचें (यापुढील अक्षरे ठशावर नीट लागत नाहीत; व इतरांनी जीं लावलीं आहेत त्यापासून काढलेला अर्थ नीट पटत नाही.)

२६. मीं चाऊरा ।। घामोजीवीआ सोंढिआ ।।

या शिलालेखाचा आजच्या मराठीतला अर्थ प्रथम डॉ. भाऊदाजी यांनी लावला. नंतर डॉ. किलहॉर्न यांनी, त्यानंतर प्रसिद्ध इतिहास संशोधक कै. वि. का. राजवाडे यांनी लावला. वि. ल. भावे यांना तिघांपैकी राजवाडे यांनी लावलेला अर्थ सर्वांत उत्तम वाटला, तरी त्यांचे समाधान मात्र झाले नव्हतेच. प्रस्तुत ग्रंथात तळटिपेत भावे यांनी राजवाडे यांचाही तर्जुमा दिला आहे. डॉ. भाऊदाजींच्या अर्थाला मात्र भावे यांनी निकालात काढले आहे.

पुरवणीकार डॉ. तुळपुळे यांनी प्रस्तुत पाठात काही दुरुस्त्या नमूद केल्या आहेत; परंतु या दुरुस्त्यांमुळे भावे यांनी लावलेल्या अर्थात काही फरक पडतो का ते दिलेले नाही, याचा अर्थ तुळपुळे यांना वरील अर्थ मान्य होता असेच म्हणावे लागेल.

या शिलालेखात नमूद केलेले दान चांगदेवाच्या मठास दिलेले दान आहे. त्यांच्याबद्दल भावे यांनी अधिक माहिती दिली आहे. ''चांगदेव हा यादव उर्फ जाधव वंशांतील सिंघण राजाच्या पदरी ज्योतिषी होता. याने आपला आजा जो प्रसिद्ध

भास्कराचार्य, ‘लीलावती’चा जनक, त्याचे व त्याच्या पूर्वीच्याही आपल्या पूर्वजांचे ग्रंथ पढविण्यासाठी एक मठ किंवा विद्यापीठ स्थापिले. या विद्यापीठास यादवांचे मांडलिक जे निकुंभ वंशांतले राजे त्यांपैकी सोहदेव व हेमाडिदेव यांनी दान दिले होते. हे दान या शिलालेखात नोंदले आहे.'' (पृ.१५) असे नमूद केले आहे.

संस्कृत वाक्यांमध्ये चांगदेवाच्या पिढ्यांचा उल्लेख आहे. गमतीचा भाग असा की, पूर्वीच्या काळात दोन भाषांत लेखन होत असे. महाजनवर्गासाठी संस्कृत व बहुजनवर्गासाठी मराठी. यातील दानाचा उल्लेख मराठीत केला आहे, याचा अर्थ बहुजनवर्गास ही गोष्ट ज्ञात व्हावी हेच असावे. तसेच मराठी भाषा जाणणारे बहुभाषिक होते हेही उघड आहे.

१९६७ साली महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालयाचा कायदा झाला तेव्हा शासनाने काही रक्कम ग्रंथालयांसाठी द्यावी असे ठरले. तीच पद्धत आजही आहे. हा कायदा आता इतका जुनाट झालाय की, त्यात बदल करण्याची आवश्यकता आहे; तसेच इतर राज्यांमध्ये जसा ग्रंथालय कर घेण्यात येतो व त्यातून सार्वजनिक ग्रंथालये चालवली जातात, तशी व्यवस्था महाराष्ट्रातल्या कायद्यात करायला हवी.

पूर्वीच्या काळी मठात, देवळात वा विद्यापीठात ग्रंथालये असत हे सर्वश्रुत आहे. शके ११२९ (इ.स. १२०७) मध्ये एक राजा विक्रीच्या कराचा भाग मठाच्या ग्रंथालयाला देतो आणि त्यातून ग्रंथालय चालते, हे पाहता महाराष्ट्राचा मान अशा व्यवस्थेत पहिला असावा. इतक्या प्राचीन काळी असणारी दूरदृष्टी आमच्या आताच्या शासनकर्त्यांच्या मनात का ठसू नये?

या परंपरेच्या ८००व्या वर्षात तरी आपल्या राज्यकर्त्यांना सार्वजनिक ग्रंथालयांबद्दल काही जाणीव येणार आहे की नाही ! अनुदाने वाढवून काय उपयोग आहे? त्यापेक्षा ती जनतेच्या पैशातून, जनतेला विनामूल्य उपलब्ध व्हायला नकोत का ? खऱ्या अर्थाने ती ‘जनते’ची ग्रंथालये (म्हणजेच Public libraries) ग्रंथालये व्हायला नकोत का ?

काळ प्राचीन असो वा अर्वाचीन असो, मानवाच्या प्रवृत्तीतच लांड्या-लबाड्या करणे, फसवणे, गैरवापर करणे, नडवून-अडवणूक करून भ्रष्टाचार करणे याकडेच कल असतो की काय, अशी शंका यावी, असा पुरावाही मराठीतल्या ज्ञात असा प्राचीन शिलालेखात सापडतो. या शिलालेखाचा ठसाही कै. भावे यांनी आपल्या पुस्तकात देऊन ठेवला आहे.

हा शिलालेख आहे चक्क मुंबईतला. शके ११०९ मधला, ''हा शिलालेख परळ येथील बंगला, हल्ली ज्यात ‘रिसर्च लॅबोरेटरी’ म्हणजे वैद्यकाचे संशोधनगृह आहे ती इमारत, बांधीत असताना त्या ठिकाणी पायात सापडला'' असे भावे यांनी नमूद केले



आहे, मात्र डॉ. तुळपुळे यांनी भावे यांची ही चूक दुरुस्त केली आहे. डॉ. तुळपुळे म्हणतात की, ''परळचा शिलालेख ११०९ चा नसून (वस्तुत: भावे यांच्या पुस्तकात हेच आकडे ११०९ ऐवजी १९०९ असे छापले गेले आहेत) ११०८ चा आहे. हा लेख साष्टी बेटात (जि. मुंबई) कुर्ल्याजवळील माहवली येथे मिळालेला आहे. अर्थात त्याचा परळशी संबंध नाही'' ही माहितीची तफावत सोडली तरी त्यावरचा मजकूर महत्त्वाचा ठरतो.

‘ठाणे कोकणचा शिलाहार राजा द्वितीय’ (तुळपळे यांचे वाक्य) ‘अपरादित्य नावाच्या एका राजाने तीर्थात स्नान करून श्री वैद्यनाथ देवास पंचोपचार पूजेसाठी ‘षट्षष्टि’ म्हणजे हल्लीची ‘साष्टी’ यांतील माहुलीजवळील एका जमिनीच्या उत्पन्नापैकी २४ द्राम उत्पन्न दिल्याचे नमूद केले आहे’ असे भावे सांगतात. हा शिलालेख साडेचोवीस ओळींचा असून देणगीची भाषा संस्कृत आहे तर २३ व २४वी ओळ मराठीत आहे. या मराठीमध्ये असणाऱ्या ओळीच महत्त्वाच्या आहेत. त्यात कडक इशारा आहे. त्या अशा –

''आता जो कोणी होऊन हे शासन मोडील त्याला श्रीवैद्यनाथ देवाची शपथ. तो सहकुटुंब पतन पावेल'' इत्यादी. (पुढील ओळ बऱ्याच प्रमाणात ग्राम्य भाषेत आहे.)

हा इशारा दिला गेला आहे याचा अर्थ हे उत्पन्न कायम चालू राहावे असे दात्याला वाटते; परंतु हे पुढे चालू राहीलच याची शाश्वती वाटत नाही. म्हणूनच ही श्रीवैद्यनाथांची शपथ घातली आहे. देवाची शपथ त्या काळी पुरेशी होती असे दिसते. ‘शहाण्याला शब्दाचा मार’ ही म्हण तेव्हा लागू पडत असावी. आता ?

दोन शिलालेखांत फरक आहे तो काळाचा, हे तर उघडच आहे; परंतु आणखी एक फरक दिसून येतो. देवासाठी उत्पन्न देताना पुढेमागे त्यात खंड पडेल अशी शंका दात्याला आली, मात्र ग्रंथालयाबाबत ‘दान’ देताना मात्र अशा इशाऱ्याची जरुरी भासली नाही. याचा अर्थ काय होऊ शकतो ? एखादे दान तोडून तुकडा दिल्याप्रमाणे दिले व दाता बाजूला झाला की त्यात खंड पडत असावा व तेच दान कराशी निगडित ठेवले तर ती कायमची सोय होत असावी, असे असावे.

शासनाने यातून धडा काय घ्यायला हवा ? ग्रंथालयांसाठी अनुदानाची सोय करून दिली म्हणजे शासनाचे कर्तव्य संपले काय ? अनुदानाचे वाटप करणाऱ्या मंडळीत चांगली सुसंस्कृत, विद्वान, व्यासंगी, अभ्यासू मंडळी आली तर ग्रंथालयांना बरे दिवस येतील. शासनाने महाराष्ट्रातल्या सार्वजनिक ग्रंथालयांचा प्रश्न अत्यंत गंभीरपणे हाती घेऊन सोडवायला हवा.

हल्लीच्या काळाचे शिलालेख कोणी बनवताना दिसत नाही; परंतु बनवलाच तर काय लिहायचे ? मसुदा काय असावा ? कोणी सांगेल काय ?

❑❑❑

# प्रभावित करणारे ग्रंथ

प्रा. के. बी. देशमुख

*नेहमी उत्तम ग्रंथांची यादी ग्रंथपालांनी द्यावी अशी वाचकांची मागणी असते. अशी यादी देण्यासाठी ग्रंथपाल हा स्वत: चांगला वाचक असावा लागतो, तरच तो चांगले ग्रंथ वाचकाला सुचवू शकतो. काही ग्रंथांचा प्रभाव इतका विलक्षण असतो की वाचकाचे अनुभवविश्वच बदलून जाते, ढवळून निघते. वाचकांची वाचनअभिरुची संपन्न करण्यासाठी प्रथम ग्रंथपालांवर त्या ग्रंथांनी प्रभाव टाकायला हवा, तो प्रभाव नेमका कोणता व कसा आहे हेही वाचकांना सांगता यायला हवे. प्रा. के.बी. देशमुखांनी काही ग्रंथांचा दाखला दिला आहे. लोकप्रिय लेखक व पुस्तकांचा हा प्रभाव कसा व का आहे हे या लेखात आले आहे. इतर अनेक पुस्तके यात यायला हवी आहेत; पण ती पुढे येतीलच !*

अक्षरांची ओळख झाली. थोरांची माहिती वाचताना लहानपणी मोठी माणसे-देखील सर्वसामान्यपणे तुमच्याआमच्यासारखीच असतात हे वाचून त्या वेळी गंमत वाटली. महाविद्यालयीन जीवनात वाचताना ना. सी. फडक्यांच्या कादंबऱ्या मनाला आनंदित करीत. मध्येच हिंदी पॉकेट बुक्स वाचलीत; परंतु त्या त्या वेळेपुरते. त्यांचा प्रभाव फार काळ मनावर खोलवर राहू शकला नाही. नंतर प्रगल्भतेकडे होत चाललेली वाटचाल आणि या वाटचालीत झालेले ग्रंथवाचन मनावर प्रभाव टाकत होते.

## ● ययाति

साहित्यक्षेत्रात मानाचा समजला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार १९७४ या वर्षी ज्या मराठी कादंबरीला जाहीर झाला ती वि.स. खांडेकरांची 'ययाति' ही कादंबरी.



महाभारतातील मूळ कथेत आलेले ययातिचे चित्रण अतिशय प्रातिनिधिक आहे. ययाति हा आजच्या सर्वसामान्य मनुष्याचा पुराणकाळातील प्रतिष्ठित प्रतिनिधी आहे. विविध सुखे मिळूनही तो अतृप्त आहे. नवनव्या सुखाच्या मागे तो आंधळेपणाने धावत आहे. जुनी आत्मिक मूल्ये उद्‌ध्वस्त झाली आहेत आणि नवीन आत्मिक मूल्ये निर्माण झालेली नाहीत. सुखाचा आंधळा शोध चालू आहे.

ययाति ही कांदबरी शब्द अंलकार यांनी ओतप्रोत भरलेली आहे. खांडेकर ययाति-मध्ये म्हणतात, ''प्रत्येक मनुष्य आयुष्याच्या शेवटी थोडासा शहाणा होतो; पण तो दुसऱ्याला लागलेल्या ठेचांनी नाही, तर स्वत:ला झालेल्या जखमांनी.''

ययाति ही कांदबरी ययातिची कामकथा आहे. देवयानीची संसारकथा आहे. शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्तिगाथा आहे. ऐतिहासिक पात्र घेऊन आधुनिकतेसोबत मांडत ही कांदबरी वाचताना वर्तमानकालीन परिस्थितीचा अनुभव येत जातो.

## ● माझी जन्मठेप

वि. दा. सावरकर यांनी भोगलेल्या जन्मठेपेवर आधारित या ग्रंथाची १९२७ मध्ये प्रथम आवृत्ती प्रसिद्ध झाली; तर १९९८ मध्ये बारावी आवृत्ती प्रसिद्ध झाली. ५२१ पृष्ठांच्या या ग्रंथात सावरकरांना झालेल्या जन्मठेपेची कहाणी आलेली आहे. २४ डिसेंबर १९१०ला पहिल्या जन्मठेपेची शिक्षा झाली. ३० जानेवारी १९११ ला दुसऱ्या जन्मठेपेची शिक्षा झाली. ६ जानेवारी १९२४ ला दोन्ही जन्मठेपांची शिक्षा संपली. या चौदा वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा भोगताना अनेक प्रकारचा त्रास, हालअपेष्टा झाल्या. लंडनमध्ये असताना जॅक्सनच्या वधाला साहाय्य केल्याच्या आरोपावरून ही शिक्षा सावरकरांना देण्यात आली होती. जन्मभर काळ्या पाण्याची शिक्षा म्हणजे २५+२५ वर्षे म्हणजे ५० वर्षांची शिक्षा.

हा ग्रंथ केवळ बंदीवासातील कष्टाचे हृदयद्रावक वर्णन करणारा नाही; तर भयंकर आपत्तीतही माघार न घेता किंवा शरण न जाता झुंजत राहण्याची स्फूर्ती देणारा आहे. एवढेच नव्हे, तर आपल्यापुढे अनेक प्रश्नांवर उपायही हा ग्रंथ सांगतो. याच काळातील त्यांच्या मनाची घालमेल स्पष्ट करणारे गीत - सागरा प्राण तळमळला.

## ● जगाच्या पाठीवर

बाबूजींचे आत्मचरित्र म्हणजे गायक सुधीर फडके यांचे मनाचा ठाव घेणारे आत्मचरित्र : जगाच्या पाठीवर. मूळ नाव रामचंद्र विनायक फडके. आईवडिलांकडून संगीताशी कधीच संबंध आला नाही; तरीदेखील बाबूजींनी मरणयातना भोगून जीवन जगले, हे जगताना संगीताची नाळ कायम जोडलेली ठेवली.

भूक काय असते आणि तिची किंमत काय असते, माणसाला वेड लागते म्हणजे काय होते आणि परिस्थितीमुळे दारिद्र्यामध्ये अनेक संकटे आलेली असताना स्वत:ला त्यातून उपाशीपोटी असताना सहीसलामत बाहेर काढणे, तोल न जाऊ देता, मान-अपमान, दु:ख, दारिद्र्य, इत्यादी शब्दांचा खरा अर्थ जगत त्यांनी अनुभूती घेतली. इतका खडतर प्रवास, अनेकदा मृत्यूला सामोरी जावसं वाटतं, यातच दु:ख, दारिद्र्य, अपमानाची तीव्रता किती असू शकते याची कल्पना येते.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जगणे तरीही संगीताबद्दल कुठे तरी मनात विश्वास, आस्था जपणे. एक धागा सुखाचा, शंभर धागे दु:खाचे हे गीत जणू त्यांच्या जीवनाला चपखलपणे लागू होणारे आहे. राजहंस प्रकाशनाने २९ जुलै २००३ ला प्रथम आवृत्ती प्रकाशित केली. पाचवी आवृत्ती २००३ ला प्रकाशित झाली. गीत रामायण ज्यांनी अजरामर करून ठेवलं त्या बाबूजींचे हे अपुरे असलेले आत्मचरित्र मनाला पूर्णपणे चटका लावून जाते.

## ● आचार्य अत्रे

आचार्य अत्रे उर्फ प्र. के. अत्रे उर्फ प्रल्हाद केशव अत्रे उर्फ केशवकुमार नावाने 'झेडूंची फुले' विडबंन काव्य लिहिणारे शब्दप्रभू, वाक्चातुर्याने ज्यांनी मोठमोठ्या सभा गाजविल्या, ज्यांच्या 'गुद्दे आणि मुद्दे'मधून विषयाची मांडणी, मन हेलावून टाकणारे त्यांचे 'समाधीवरील अश्रू' आणि मनाला 'हुंदके' घालायला लावणारे हुंदके हे ग्रंथ. 'चांगुणा' ही कांदबरी मनात घर करून जाते.

प्र. के. अत्रेंच्या भाषणावर आधारित 'हशा आणि टाळ्या'शी आपण केव्हा समरस होऊन जातो ते कळत नाही. 'मराठी माणसे मराठी मने' या ग्रंथात हसतहसत माणसांच्या अंतरंगाचे मनोहारी दर्शन घडवितात. 'मोरुची मावशी', 'तो मी नव्हेच', 'सांष्टाग नमस्कार', 'घराबाहेर', 'लग्नाची बेडी', 'जग काय म्हणेल', 'कवडीचुंबक' या नाटकांतून सामाजिक प्रश्नांवर हसतहसत भाष्य करत डोळ्यांत अंजन घालत अंतर्मुख करायला लावणारे विषय हाताळले.

हिम्मत काय असते हे आचार्य अत्रेंचे 'कऱ्हेचे पाणी' पाच खंडातील २५०१ पृष्ठांचे आत्मचरित्र वाचले म्हणजे समजते. समुद्रात अनेक नावाडी नाव सोडून असावेत आणि एकदम अचानक तुफान यावे, तुफान पाहून सर्वच नावाडी माघारी फिरतात; परंतु या तुफानालाही न घाबरता एका नावाड्याने आपली नाव तुफानातून पुढेच घेऊन जावी आणि किनाऱ्यावर बसलेल्या लोकांना वाटावे आता या नावेला कधीही जलसमाधी मिळते की काय ? दुसऱ्याच क्षणी नावाड्याने नाव व्यवस्थित तुफानातून बाहेर काढावी आणि त्याला किनाऱ्यावरील लोकांनी सांगावे बाबा वळव रे आता माघारी नाव सुरक्षित



स्थळी. परंतु खट्याळ पोराने जसे न ऐकता परत दुसऱ्या तुफानाला सामोरी जावे असा हा काहीसा अत्रेंच्या बाबतीत अनुभव कऱ्हेचे पाणी वाचताना येत जातो. हा हिम्मतीचा बादशहा खरोखरच आर्थिकदृष्ट्या कफल्लक असतानादेखील केवळ कशावर तरला असेल तर फक्त स्वत:वर असलेल्या भरवशावर.

हिम्मत, स्वत:वर असलेला भरवसा हे काय असते, तो कसा टिकवयाचा असतो हे ज्यांना जाणायचे त्यांनी भाषाप्रभू अत्रेंचे कऱ्हेचे पाणी थोडेसे चाखावे. शब्दाचे शक्ती, सामर्थ्य, वजन हे माहीत करून घ्यायचे तर कऱ्हेचे पाणी वाचले पाहिजे.

आचार्य अत्रे जीवनाबद्दल म्हणतात, ''जीवनाचे हे विलक्षण वेड माझ्यामध्ये कसे आले. लहानपणापासून निसर्गाची अन इतिहासाची मला सोबत मिळाली. ब्रह्मदेवाच्या कमंडलूतून उगम पावलेल्या कऱ्हेच्या काठी मी जन्माला आलो आणि तिच्याच अंगा-खांद्यावर जेजुरीच्या खंडोबाच्या भंडाऱ्याने वाढलो; मोठा झालो. उशाला शिव छत्रपतींचा पुरंदर किल्ला अष्टौप्रहर पहारा करी. तर श्री सोपानदेवाची भक्तिवीणा सदैव वाजे.''

## ● पु. ल. देशपांडे

अष्टपैलू व्यक्तिमत्त्वातले महाराष्ट्रातील आणखी एक लेखक म्हणजे पु. ल. देशपांडे यांचे मनात हास्याची कारंजी फुलविणारे लिखाण 'व्यक्ती आणि वल्ली', 'नस्ती उठाठेव', 'केल्याने देशाटन', 'गुण गाईन आवडी', 'जावे त्यांच्या देशा', इत्यादी मनसोक्त हसत हसत मार्मिकपणे चिमटे काढत पुल.. आपणास कुठल्या कुठे घेऊन जातात. हा कोट्यधीश लेखक पैशाने नव्हे कोट्या करण्यात कोट्याधीश. या लेखकाचे साहित्य वाचताना आपणास हसण्याच्या आनंदातून कधी लक्षाधीश करून जातात हे कळतदेखील नाही.

## ● कृष्णाकाठ

माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र 'कृष्णाकाठ'. १२ मार्च १९१३ मध्ये देवराष्ट्रे या मामाच्या गावी यशवंतरावांचा जन्म झाला. यशवंतराव ४ वर्ष वयाचे असताना वडील प्लेगने वारले. पुढील जबाबदारी आईने पेलली. या ग्रंथात यशवंतराव आपल्या आईबद्दल म्हणतात, ''माझी आई शाळेत शिकली नव्हती; पण ती शिक्षणाचे मोल मनोमन जाणत होती. आमच्या घरची तशी गरिबी असली तरी संस्कारांनी आई श्रीमंत होती. ही श्रीमंती आम्हा मुलांपर्यंत पोचविण्याचा तिचा सततचा प्रयत्न होता.''

प्रतिकूल परिस्थितीचे भांडवल न करता निष्ठेने कार्यावर श्रद्धा ठेवून जिद्द, चिकाटीने प्रयत्न केले तर सामान्य माणूस कुठल्या कुठे जाऊ शकतो. यशवंतराव म्हणतात,

''व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत परिस्थिती, काल, व्यक्ती, समाज व त्याचबरोबर ग्रंथदेखील तेवढीच महत्त्वाची भूमिका बजावतात.''

## ● महानायक

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांत अनेक नायक झाले त्यात एक – ते म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस. सुभाषचंद्रांच्या जीवनावर आधारित विश्वास पाटील या लेखकाने अथक परिश्रम करून 'महानायक' नावाची कादंबरी लिहिली. १०११ पृष्ठांची कांदबरी प्रथम आवृत्तीचे प्रकाशन ११ नोव्हेंबर १९९८ रोजी राजहंस प्रकाशनाने केले.

आय.सी.एस. (इंडियन सिव्हिल सर्व्हिस) सारखी महत्त्वाची परीक्षा पास केली असताना उत्तम नोकरी न करता देशसेवेसाठी पेटून उठणे, स्वत:चे वैयक्तिक स्वार्थ बाजूला सारून स्वत:ला देशसेवेसाठी झोकून देणे हा सुभाषबाबूंचा प्रवास मोठा रोमांचकारी, अंगावर शहारे आणणारा, प्रेरणादायी आहे.

सुभाषबाबू १६ जानेवारी १९४१ रोजी घरावर जागता पहारा असताना पठाणाच्या वेशात घरातून बाहेर पडले. पेशावरहून त्यांना रशियाला जायाचे होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रवास प्रथम पायी नंतर खेचरावरून. ट्रकने जलालाबादला पोचले. काबूलमध्ये ५० दिवस थांबले. रशियाचा व्हिसा मिळाला नाही. जर्मनीतून इटली, रोम असा प्रवास.

आझाद हिंद फौजेचे नेतृत्व, प्रथमच महिलांची झाशीची राणी महिला तुकडी स्थापना डॉ. कॅ. लक्ष्मी यांच्या सहकार्याने केली. अत्यंत निकराने जिद्दीने तयार केलेली तुकडी. अनेक सैनिक साथीदार तयार केले. स्वातंत्र्यलढ्यासाठी लढले. या प्रसंगांची अत्यंत जिवंत चित्रे विश्वास पाटलांनी रेखाटली. ही कादंबरी वाचताना ऐतिहासिक प्रसंग जिवंत होतात. आपणास लेखक त्या ऐतिहासिक काळात घेऊन जातो. विश्वास पाटील यांच्याकडे ही कादंबरी लिहीत असताना अतिरिक्त जिल्हाधिकारीपदाचा कार्यभार असतानादेखील ब्रह्मदेश (म्यानमार), थायलंड, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड येथे प्रत्यक्ष जाऊन माहिती जमा केली. त्या वेळच्या हयात असलेल्या डॉ. कॅ. लक्ष्मी सहेगल, सुभाषचंद्रांची कन्या प्रा. अनिता बोस, इत्यादी व्यक्तींच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या. त्यांच्यासोबत चर्चा केली व या महान कांदबरीची निर्मिती केली. खरोखरच महानायक असलेला हा ग्रंथ प्रभावित करून जातो.

## ● झोंबी

प्रा. आनंद यादवांची आत्मचरित्रात्मक ग्रामीण कादंबरी झोंबी. ग्रामीण जीवन जगताना परिस्थिती, अज्ञान यांच्याशी द्यावी लागणारी झुंज म्हणजे झोंबी. ही झोंबी



खेळत असताना होणारी दमछाक, बालपणी झालेली हेळसांड, अज्ञान, दारिद्र्य यांतून होणारा त्रास, वाट्याला आलेला संघर्ष, प्रयत्नपूर्वक केलेली वाटचाल, अनेक प्रलोभनांपासून स्वत:ला सावरून आहे त्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी जीवापाड प्रयत्न आणि त्याला आलेले यश. झोंबीमध्ये यादवांच्या एसएससीपर्यंतच्या काळाचे मन हेलावून टाकणारे अनुभव आहेत. एम. ए. पर्यंतचे त्यांचे अनुभव 'नांगरणी' या ग्रंथात व्यक्त झालेले आहेत; तर 'घरभिंती'मध्ये प्राध्यापक झाल्यापासूनचा १८ वर्षांचा कालखंड आहे १९६१ ते १९७८. आजच्या जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनातही महाभारतसदृश संघर्षपूर्ण घटना केवळ अस्तित्वासाठी घडत असतात याचे वास्तवपूर्ण भेदक दर्शन घरभिंतीत घडते. ग्रामीण समाजाच्या सर्वसाधारण स्तरातील कुटुंबाची प्रातिनिधिक तरीही वैशिष्ट्यपूर्ण कहाणी. जन्मप्राप्त अटळ जीवघेण्या आर्थिक हलाकीचा चक्रव्यूह भेदून बाहेर पडण्यासाठी केवळ काही शैक्षणिक सुविधांच्या तुटपुंज्या आधारावर आनंद यादव यांनी संवेदनशील मनाने दिलेला निकराचा पण यशस्वी लढा.

## ● कोसला

भालचंद्र नेमाडे यांची ही कांदबरी तरुणपिढीची कहाणी आहे. सामाजिक संकेतासाठी मिळतेजुळते घेताना होणारी मनाची तडफड. मराठी साहित्यात वेगळ्या अंगाचे दर्शन घडविणारी साहित्यकृती.

## ● मानवजन्माचे नाटक

जेष्ठ गुजराथी कांदबरीकर पन्नालाल पटेल यांची मूळ गुजराती कांदबरी 'मानवीनी भवानी'. या कांदबरीस साहित्यातील ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. भाऊ धर्माधिकारी यांनी या कांदबरीचे मराठीत भाषांतर केले. 'मानव जन्माचे नाटक' अस्थिरता, लूटपाट, नैसर्गिक आपत्ती, सावकार, राजे आणि अफू या सर्वांनी जाचलेल्या, लुटलेल्या, पिळलेल्या आणि तरी जगण्याच्या कोणत्या तरी अद्भूत शक्तीच्या जोरावर पुन्हा पुन्हा गीते गाऊन गावे गर्जून टाकणाऱ्या खेड्यातील कष्टकरी समाजाचे माहात्म्य. हे माहात्म्य कल्पना किंवा तरंगी भावावेशाने उभे केलेले हे माहात्म्य नाही, तर इतिहासाच्या अग्निदिव्यातून तावून सुलाखून बाहेर पडलेले हे माहात्म्य आहे.

पन्नालाल पटेलांनी मानवजन्माचे नाटक ही कालप्रधान कादंबरी लिहून जी नवी चाकोरी पाडली आहे तिला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. गुजराथच्या सरहद्दीवरील चार दशकांपूर्वी वसणाऱ्या नव्या व जुन्या जमान्याच्या संधीकालावर येऊन वळण घेणाऱ्या खेड्यांची ही हकीकत आहे.

ही कादंबरी ग्रामीण समाजाची कथा आहे. तिला गती देणारी शक्ती काळ ही

आहे. जणू सबंध कथेचे मुख्य पात्र काळ हेच आहे आणि बाकीची सगळी काळाच्या तालावर नाचणारी पात्रे आहेत.

या कादंबरीतील नायिका जिचे नाव राजू आहे मृत्युबद्दल म्हणते – ''तुम्हांला मरणाची नवलाई वाटते, पण आम्ही जिंदगीच्या नावाने आंघोळ करून बसलो आहोत. आतापासूनच दिवशी तीन, चार मढी जळताना बघतो आहोत. त्याचबरोबर एक दिवस आमचीही. प्राणवात असतात. मृत्यू येतो तेव्हा त्याचे आशीर्वाद मागतात. प्राणवान माणसे जगण्यामरण्याची चिंता करत नसतात. ज्यांची संगत मिळाली त्यांना आपल्या धैर्याने दान करीतच जाणार.

पन्नालाल पटेलांनी जीवनाचे तत्त्वज्ञान मांडताना या कांदबरीत सांगितले, माणूस वाईट नाही; बाबा भूक वाईट आहे. ते पुढे स्वाभिमानी व्यक्तींच्या बाबतीत म्हणतात, मी पण भूक सर्वांत वाईट म्हणत होतो; पण तिच्यापेक्षाही वाईट एक दुसरं मी ऐकलं. भुकेपेक्षा वाईट आहे भीक. भूक फक्त हाडामासाला सुकवून टाकते; पण भीक आमच्या अभिमानाला, आत्म्यालासुद्धा हळूहळू खाऊन टाकते. मानवजन्माचे नाटक यातील नायिका एकाकीपणे विधवेचे जीवन जगताना ज्या पद्धतीने तिने धैर्याने संकटांवर मात केली त्याला तोड नाही.

जीवन जगले पाहिजे, प्रसंगी खडतर प्रवास करूनदेखील. हा एक जीवघेणा संघर्ष आणि त्यात त्या महिलेने संपादित केलेला विजय अत्यंत मनोवेधक आहे.

## ● मुळ सोता उखडेला

भारत–पाक फाळणीच्या काळामध्ये पुनर्वसन कार्यात गुंतलेल्या एका कार्यकर्तीची रोजनिशी म्हणजे मूळ गुजरातीत असलेली 'मुळ सोता उखडेला' या श्रीमती कमलाबेन पटेल यांच्या रोजनिशीचा मराठी अनुवाद लीला पटेल यांनी केला. मराठीत या ग्रंथाचे नांव 'रक्त पहात'. ग्रंथाली प्रकाशनाने प्रथम प्रकाशन ९ ऑगस्ट १९९२ रोजी प्रकाशित केले.

कमलाबेन पटेल यांनी फाळणीनंतर पुनर्वसनाचे काम करत असताना सहवेदना मनाला कशा भिडत असत, त्यातून असंख्य व्यक्ती, त्यांचे प्रश्न मती गुंग करणारे असत, त्या कार्यपद्धती, तो काळ या सर्व प्रसंगाचे अत्यंत भावनिकतेने आपल्या रोजनिशीत वर्णन केले आहे. हृदयाला पाझर फोडणाऱ्या अनेक सत्यकथा यात आहेत. खरोखरच आपण इतिहासापासून काही शिकणार का?

## ● माझी जीवनकहाणी (द स्टोरी ऑफ माय लाईफ)

हेलन केलर यांची ही जीवनकहाणी. हेलन केलर यांचा अंधत्व, मुकेपणा आणि



बधीरता अशा तिहेरी अपंगत्वाशी सामना देत अंधाराला हरवणारा संघर्ष.

मुक्या असून त्या बोलायला शिकल्या. पुढे त्यांनी व्याख्यानेही दिली. पत्रकारिता केली, संघर्षशील जीवन आनंदाने जगल्या. आपण तर डोळस माणसे. शरीराने परिपूर्ण असताना आपण का बरे रडत बसावे ? मला हे मिळाले नाही, ते मिळाले नाही. शरीराने धडधाकट असणाऱ्या व्यक्तींना हेलन केलर यांच्या जीवनापासून नक्कीच प्रेरणा मिळेल.

## ● फुले वेचिता

गानसम्राज्ञी लता मंगेशकरांचे आत्मचरित्र. १९९७मध्ये ग्रंथालीने प्रथम आवृत्ती प्रकाशित केली.

लतादीदींचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे झाला. बालपण मजेत गेले. परंतु मधला काळ कठीण गेला. लतादीदी म्हणतात, ''लहानपणी मी अत्यंत खोडकर होते. नंतर व्यावहारिक जबाबदाऱ्या पडल्या आणि सगळं चित्रच बदललं. माझी आजी आईची आई खानदेशातील. तिला तीनसाडेतीन हजार ओव्या, लोकगीते पाठ होती. ती आम्हांला शिकवायची. याचा पुढे मला गाण्यात खूप उपयोग झाला.''

''रोशन आराच्या गाण्याचा प्रभाव माझ्यावर होता. सुरुवातीस मी तसे गायचा प्रयत्न करत असे; परंतु माझ्या गुरूंनी कोणाचीही नक्कल करू नको असे सांगितले. स्वत:चा आवाज वेगळा ठेव. मी ते ऐकले.''

गाण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. भालजी पेंढारकरांच्या 'साधी माणसं' या मराठी चित्रपटास 'आनंदघन' नावाने संगीत दिले.

स्वत:ला उच्च शिक्षण घेता आले नाही तरी त्यांनी आपल्या भावाबहिणींना उच्च शिक्षण दिले.

## ● बंध–अनुबंध

कमल पाध्ये यांचे मौज प्रकाशनाने ८ ऑक्टोबर १९९३ रोजी प्रकाशित केलेले 'बंध–अनुबंध' आत्मचरित्र. समाज कार्यकर्त्यांच्या प्रकल्पात काम करताना शिबिरात सर्व थरांतील स्त्रियांचे विचार ऐकले, चर्चा केली; अन् असं जाणवलं, 'जुन्या धर्मनिष्ठ आणि पुरुषप्रधान संस्कृतीचे स्त्रीमनावर आपल्या कनिष्ठपणाचे जे संस्कार झालेले आहेत त्यातून स्त्री बाहेरच पडली नव्हती.'

स्त्री–पुरुष असमानतेवर आधारलेल्या अनेक रूढींच्या आणि परंपरांच्या दबावामुळे बहुतेक स्त्रिया स्वत:वर होणारे अन्याय सहन करत तशाच जगत आहेत. याबद्दल चर्चा करत असताना समानता आणि स्वतंत्रता हा आपल्या घराचा पाया बनण्यासाठी निमूट गप्प बसण्याची परंपरा तोडा आणि घरीदारी होणाऱ्या अवमानाविरुद्ध आवाज उठवा.

कमल पाध्ये पुढे असं म्हणतात, ''माणसांच्या प्राथमिक गरजांप्रमाणे वात्सल्य, प्रेम आणि स्नेह ह्याही त्यांच्या महत्त्वाच्या भावनिक गरजा आहेत. त्यातून निर्माण होणारे भावभावनांचे आणि नात्यागोत्यांचे गुंतागुंतीचे बंध-अनुबंध आणि त्यातून उद्‍भवणाऱ्या समस्या तितक्याच उत्कटतेने भावलेल्या आहेत.'' त्याबद्दलचे विचार या ग्रंथात मांडलेले आहेत.

## ● रशीदी टिकीट

ज्या लेखिकेला साहित्यनिर्मितीसाठी साहित्यातील सर्वोत्कृष्ट ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला अशा पंजाबी लेखिका अमृता प्रितम यांचे गाजलेले आत्मचरित्र रशीदी टिकीट.

रशीदी टिकीट त्यांच्या बिनधास्त जीवनाचे चित्रण आहे. जीवन सामाजिक संकेत व रूढीपरंपरांनुसार जगले पाहिजे. विशेषत: स्त्रियांनी हा सर्वसाधारण नियम झुगारून व्यक्ती म्हणून स्वत:ला स्वत:च्या मनाप्रमाणे जगता आले पाहिजे. हीसुद्धा इच्छा सर्व महिलांना पूर्ण करता येईलच असे नाही.

परंतु अमृता प्रितम त्यांना पाहिजे तसे जगल्या. हे जगण्यासाठी फार मोठ्या हिम्मतीची गरज असते. ती त्यांच्यात पाहावयास मिळते.

## ● एक होता कार्व्हर

मीना गवाणकर यांनी अनुवादित केलेली कार्व्हर यांची जीवनकहाणी. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झुंजत काळा असलेला जॉर्ज, त्याला आपली कीव केली जावी हे पसंत नसे. त्यामुळे संपूर्ण स्वावलंबन त्याच्या अंगी रुजले. आपले प्रश्न आपणच सोडवायचे, आपल्या जबाबदाऱ्या आपणच पार पाडायच्या.

निसर्गशाळेत तो जास्त शिकत होता. वनस्पतीशी त्याला जास्त परिचय होता. दक्षिण अमेरिकेतील टस्कगीतील निग्रोंची शाळा त्या समाजाचे महत्त्वाचे अंग बनले. विद्यार्थ्यांची सर्वांगीण जडण-घडण उत्तम प्रकारे व्हावी, हे विद्यार्थी शिकून बाहेर पडल्यावर त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग बांधवांच्या उद्धारासाठी करावा, आत्मोन्नतीबरोबर समाजोन्नती साधावी.

कार्व्हरने शेती विकासासाठी वेगवेगळे प्रयोग केले. सेंद्रिय खत व सेंद्रिय शेतीची संकल्पना प्रत्यक्षात आणली ती १८९६ मध्ये. ज्याची गरज आपणांस ११० वर्षांनी जाणवते. यातच कार्व्हरच्या दूरदृष्टीची कल्पना येते.

कृषीवर आधारित संशोधन हा त्यांच्या आयुष्याचा एक भाग झाला होता. कापसाच्या पऱ्हाटीपासून कागद, दोरखंड, घोंगड्या बनविण्याचे तंत्रज्ञान त्या काळात विकसित केले.



लोकांच्या आजारावर उपलब्ध वनस्पतींचा वापर व त्याची माहिती सर्वांना करून देणे, मातीतून निळा रंग शोधून काढला. हे संशोधन स्वत: पेटन्ट घेऊन श्रीमंत झाले नाही, तर हे संशोधन गरीब जनतेला उपलब्ध करून दिले. त्यांच्या परवडणाऱ्या किमतीत.

१८९९ साली फिरत्या कृषिविद्यालयाने जन्म घेतला. शेतकऱ्यांना माती व पाणी परीक्षण करून दिले जात होते. ज्याची आपणांस आजदेखील गरज आहे. गर्दीच्या ठिकाणी जसे बाजार, चर्च, इत्यादी ठिकाणी कृषिमालावर आधारित तयार वस्तूचे प्रदर्शन भरवत माहिती सांगत. कार्व्हरच्या संशोधनाबद्दल अलाबामातील वृत्तपत्रांनी असे म्हटले आहे, 'जगातील इतर कोणत्याही शास्त्रज्ञाने केले नसेल एवढे कृषिसंशोधन एकट्या प्रा. कार्व्हर यांनी केले आहे. वनस्पतिजन्य पदार्थांचे रासायनिक विघटन त्यांच्या इतके क्वचितच कोणाला ज्ञात असेल. अशा या थोर भूमिपुत्राबद्दल अलाबामाला सदैव अभिमानच वाटेल.'

अविवाहित कार्व्हरला पैशाचा मोह असा नव्हता. त्यांनी संशोधनकेंद्रातील पगारवाढ घेतली नाही. शास्त्रज्ञ एडिसनने देऊ केलेली एक लाख डॉलर्सची विनंती-देखील मान्य केली नाही. त्यासाठी त्यांना न्यूजर्सीला जावे लागणार होते. याबाबत कार्व्हर म्हणतात, 'माझी माझ्या बांधवाना जास्त गरज आहे.' काय अजब रसायन आहे माती अन माणसांची नाळ कायम ठेवणारं !

प्रा. कार्व्हरनी कापूस, भुईमूग, रताळी यांवर मूलभूत संशोधन केले. नवनव्या जाती, त्यांवर पडणारे रोग, त्यांवर उपाययोजना, भुईमूग व रताळापासून १३५ वस्तूंची निर्मिती. दूध, चॉकलेट, स्टार्च पावडर, इत्यादी यामुळे अतिरिक्त उत्पादन झाले तर बाजारात मंदी येत असे; या वेळी अशा टिकाऊ वस्तू तयार करून ठेवता येत असत व शिवाय वस्तू वेगवेगळ्या स्वरूपात निर्माण केल्यामुळे त्यांची मागणीदेखील वाढली. कापूस किंवा भुईमुगास जी मागणी वाढत नसे ती मागणी वाढू लागली.

शेतकऱ्यांना त्यांच्या भाषेत अन्नधान्य टिकविण्याच्या सुलभ पद्धती शिकविल्या. वाळवा, सुकवा, उन्हं द्या. साध्या जाळ्या, स्टोह, मच्छरदाण्यांच्या कपड्यापासून स्वच्छ सूर्यप्रकाशात कोणते अन्नपदार्थ टिकविता येतात यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या.

भुईमुगाच्या टरफलापासून जमीन भुसभुशीत करणारे खत, यामुळे जमिनीला सेंद्रिय खत मिळते. यात नायट्रोजन, पोटॅश व फॉस्फेटचे प्रमाण असते. कार्व्हरनी सांगितल्यानंतर २० वर्षांनंतर याचा वापर सुरू झाला.

प्रा. कार्व्हर हे शेतीशास्त्रज्ञ तर होतेच; ते अर्थशास्त्रज्ञदेखील होते. ते केवळ इतर शास्त्रज्ञांप्रमाणे शोध लावला माझे काम संपले असे नव्हते; तर नवनवीन शेती प्रयोगांतून अतिरिक्त उत्पादन झाले तर त्यावरदेखील संशोधन करून शेती प्रश्नांची उकल करून त्यांची उत्तरेदेखील शोधून काढत. यातच त्यांचे मोठेपण सामावले आहे.

❑❑❑

# तंत्रशिक्षणसंस्था व अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालयातील ऑनलाईन वाचनसाहित्याची नवी वाटचाल : INDEST-Consortium

प्रकाश बोडके / महेंद्र आढाव

इंटरनेटच्या वाढत्या प्रभावामुळे ऑनलाईन स्वरूपाचा विविध वाचनसाहित्याचा अनुभव घेणे सहज शक्य झाले आहे. ऑनलाईन नियतकालिके व ऑनलाईन डेटाबेस वाचनसाहित्य ह्याचा कायदेशीर वापर करणे आणि स्वतंत्ररित्या सभासदत्व घेणे हे INDEST - consortium मुळे असंख्य महाविद्यालयांना शक्य झाले आहे. ह्या कल्पनेवर आधारित मानवसंसाधन मंत्रालयाने [Ministry of Human Resource Development (MHRD)] इंडियन नॅशनल डिजिटल लायब्ररी इन इंजिनीअरिंग सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी INDEST- consortium च्या मान्यतेनुसार बंगलोरमध्ये सन २००२ प्रा. एन. बालाक्रिशनन ह्यांच्या आधिपत्याखाली तज्ज्ञ गटाची नेमणूक करण्यात आली. एम.एच.आर.डी.तर्फे आपल्या मुख्य सभासदांना ऑनलाईन नियतकालिके व ऑनलाईन डेटाबेस वाचनसाहित्य ह्याचा वापर करावा ह्याकरिता आर्थिक मदत देण्यात येते. ह्या महत्त्वाकांक्षी कल्पनेचा आरंभ करणे, लाभ घेणे हे फक्त आता आपल्या मुख्य सभासदांपुरते मर्यादित न राहता सर्व महाविद्यालयातील संस्थांना मुक्त व खुल्या धोरणाच्या (Open ended Policy) अधिपत्याखाली पुढील कालावधीत सर्वांना खुले झाले.

INDEST-Consortium चे सभासदत्व स्वीकारणाऱ्या महाविद्यालयांची एकूण संख्या आता वाढून १५७ झाली आहे व त्यांनी त्या अंतर्गत ६,५०० इलेक्ट्रॉनिक्स नियतकालिके व इलेक्ट्रॉनिक्स संदर्भ सूचिमय डेटाबेस वाचनसाहित्याची वर्गणी चालू केली आहे.

## हेतू

INDEST-Consortium मागील हेतू खालीलप्रमाणे –

- INDEST-Consortium मागील मुख्य हेतू म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स वाचनसाहित्य सभासदांना सवलतीच्या दरात देणे.



- INDEST-Consortium मुळे इलेक्ट्रॉनिक्स नियतकालिके व इलेक्ट्रॉनिक्स संदर्भ सूचिमय डेटाबेस वाचनसाहित्याचा फायदा घेणे फक्त मुख्य सभासदांपुरता मर्यादित न राहता सभासदत्व स्वीकारण्यास सर्व इंजिनीअरिंग विषयाला व वैज्ञानिक विषयाला वाहिलेल्या महाविद्यालयांना घेता येईल.
- INDEST-Consortium माध्यमातून त्याचे सभासदत्व स्वीकारून इलेक्ट्रॉनिक्स वाचनसाहित्याचा उपयोग करण्यास महाविद्यालयीन ग्रंथालयांतील वाचकांना व ग्रंथपालांना इलेक्ट्रॉनिक्स वाचनसाहित्याच्या वापराचे प्रशिक्षण प्रदान करणे.
- INDEST-Consortium च्या साहाय्याने ग्रंथालय सहकाराचे प्रवेशद्वार खुले करून सभासद ग्रंथालयांमध्ये सुसंवाद प्रस्थापित करणे.
- INDEST-Consortium माध्यमातून सभासद महाविद्यालयांमध्ये ग्रंथालयाप्रमाणे सुसंवाद वाढविणे.
- INDEST-Consortium च्या माध्यमातून सभासद महाविद्यालयांमध्ये शास्त्रीय उत्पादकता वाढवून वाचनसाहित्याची गुणवत्ता व संख्यामध्ये वाढ निर्माण करणे.

## ऑनलाईन नियतकालिके व ऑनलाईन डेटाबेस वाचनसाहित्य सभासदत्वाचे फायदे

नियतकालिके प्रकाशनामध्ये अग्रेसर असणारे प्रकाशक आता नियतकालिकांच्या अंकांची इलेक्ट्रॉनिक्स प्रत (version) वर्ल्ड वाईड वेब (www) वरती प्रकाशित करतात. अशा इलेक्ट्रॉनिक्स नियतकालिकांच्या अंकांच्या वापराचा मार्ग इंटरनेटच्या त्या नियतकालिकांच्या अंकांच्या संकेतस्थळाद्वारे वाचकांना खुला करता येतो. ऑनलाईन नियतकालिकांतील लेख व ऑनलाईन डेटाबेस वाचनसाहित्य प्राप्तीमुळे व त्यांच्या वापरामुळे वाचकांना व ग्रंथपालांना मोठ्या स्वरूपात फायदे अनुभवता येतात; ते खालीलप्रमाणे –

- निसर्गशास्त्रे व सायन्स या विषयाला वाहिलले नियतकालिके आपल्या महत्त्वाच्या आवृत्ती ऑनलाईन स्वरूपात प्रकाशित करीत असतात. त्यातील बहुतांशी वाचनसाहित्य हे प्रयोगशील स्वरूपात व तक्त्याच्या स्वरूपात प्रकाशित करत असतात. अशा स्वरूपाचे वाचनसाहित्य छापील स्वरूपात प्रकाशित होत नसते. अशा प्रकारे ऑनलाईन नियतकालिकांचे सभासदत्व फायदेशीर ठरते.
- काही प्रकाशक जसे अमेरिकन केमिकल सोसायटी ऑनलाईन (Springer) आयडियल (Academic) व अरली व्हु (Wiley) ह्यांच्या नवीन प्रकाशन नियमावलीनुसार ते प्रकाशित करणाऱ्या नियतकालिकांच्या अंकातील लेख त्यांच्या प्रकाशन कालावधीअगोदर वेबवरती वाचकांसाठी प्रकाशित होईल व या नवीन

नियमावलीचा फायदा शास्त्रज्ञ व त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना आपल्या नवीन संशोधन विषयाच्या प्रकल्पाची मांडणी व लेखन करण्यासाठी अधिक उपयुक्त ठरेल.

- इलेक्ट्रानिक्स नियतकालिके प्रकाशित करणारे प्रकाशक पुष्कळ वेळा आपले लेख PDF आराखड्यात सादर करतात. ह्या PDF मधील लहानशा फाईलमध्ये वाचकाला स्पष्ट दिसेल अशा लहान स्वरूपात छापील लेखाचे स्वरूप संकलित केलेले आढळते. अशा हजारो PDF लेखांचे संकलन हार्ड डिस्कवर ग्रंथपालांना करता येते व वाचकांना उपलब्ध करून देता येते.
- इलेक्ट्रॉनिक्स नियतकालिके प्रकाशित करणारे प्रकाशक त्या अंकातील लेखांच्या मुख्य हेडिंगवर एच.टी.एम.एल. (HTML) लिंकद्वारे त्या लेखांचे संक्षिप्त सार, तक्ते, आलेख, प्रतिमा, नकाशे सादर करतात. त्यामुळे वाचकांना त्या लेखाच्या आरंभीच्या ओळींमध्ये व त्या लेखाच्या शेवटच्या ओळीत सहजपणे पोहचण्यास फायदा होतो.
- काही नियतकालिके आपल्या नवीन प्रकाशित होणाऱ्या अंकातील अनुक्रमाणिका ई-मेलच्या साह्याने ग्रंथपालांना / वाचकांना पाठवितात तसेच वेबवरती प्रकाशित होणारे डेटाबेस त्या लेखाच्या विषयशीर्षक ओळीच्या आधारे व त्या लेखातील मुख्य संज्ञांचा वापर करून ग्रंथपालांना तसेच वाचकांना ई-मेलच्या साह्याने काही कालावधीच्या मर्यादेनंतर वारंवार पाठवीत असतात. याचा उपयोग अभ्यासकांना व संशोधकांना त्यांच्या अभ्यासात होतो.
- ऑनलाईन नियतकालिकातील अंकांच्या अनुक्रमाणिका शोधणे हे त्या अंकाच्या वेब संकेतस्थळावरील तत्पर सर्च इंजीनद्वारे वाचकांना सहज शक्य होते. तसेच अशा सर्च इंजीनद्वारे अभ्यासकांना नियतकालिकांच्या संकेतस्थळावरील असंख्य अनुक्रमणिकांमधून आपल्या संशोधनविषयाचा शोध, संज्ञा शोधण्यास अभ्यासकांचा वेळ वाचतो व योग्य स्वरूपाची माहिती संपादन होते. अशाच स्वरूपाची माहिती छापील नियतकालिकांमधून मिळण्यास संशोधकांना, अभ्यासकांना त्या नियतकालिकांतील सर्व अंक प्राप्त करण्यासाठीच साधारणत: एक सप्ताह लागेल किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी लागेल व त्यासाठी संशोधकांना मोठ्या प्रमाणात वेळ लागेल आणि आपल्या संशोधनविषयाचे संशोधन कालावधीत पूर्ण होणार नाही.
- ऑनलाईन नियतकालिकांच्या सभासदत्वाद्वारे सभासदांना मागील अंकाचा संदर्भ घेणे शक्य होते. अशा प्रकारे छापील नियतकालिकांमार्फत मागील अंकाचा संदर्भ देण्यासाठी ग्रंथालयांना मोठ्या प्रमाणात खर्च सहन करावा लागतो.



- ऑनलाईन नियतकालिकांच्या वर्गणीद्वारे सभासद ग्रंथालयांना छापील नियतकालिकांद्वारे निर्माण होणाऱ्या उणिवा टाळता येतात. जसे, नियतकालिकांचा अंक न मिळणे, अंक मिळण्यास विलंब होणे, अंक संक्रमण मार्गात फाटणे, गहाळ होणे, इत्यादी उणिवांवर ऑनलाईन नियतकालिकांच्या वर्गणीधारकांना निर्बंध आणता येतो. तसेच छापील अंक सभासद ग्रंथालयांना मिळाल्यानंतर त्या अंकांची नोंद करणे, संदर्भलेखांच्या नोंदी करणे, वर्गीकरण करणे, त्या अंकांची स्थाननिश्चिती करणे, वर्षाच्या शेवटी बांधणी करणे, अशा सर्व कामांचा वाढणारा व्याप ग्रंथपालाला ऑनलाईन नियतकालिकांच्या सभासदत्वाद्वारे कमी करता येतो. ऑनलाईन सभासद ग्रंथालयांना छापील अंकाचे वाचकांकडून आवडीच्या लेखांची पाने फाडणे, चोरी करणे तसेच काही वाचकांकडून आपल्या आवडीच्या ओळीखाली रेषा मारणे, पाने दुमडणे अशा विविध स्वरूपाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत नाही. तसेच ऑनलाईन सभासदांना नियतकालिकांची स्थाननिश्चितीसाठी वाढीव स्वरूपात जागा लागत नाही व जुन्या नियतकालिकांच्या बांधीव अंकांवर निर्माण होणाऱ्या धुळीचा प्रश्नच उद्भवत नाही.
- इलेक्ट्रॉनिक्स वाचनसाहित्याचे सभासदत्व स्वीकारण्याबाबत महाविद्यालयांना बलसंपन्न केले आहे ते INDEST- Consortium व प्रकाशकांमधील कराराने. ऑनलाईन नियतकालिकांमुळे वाचकांना सुगमता साधणे शक्य झाले. INDEST- Consortium च्या माध्यमातून ऑनलाईन वाचनसाहित्याच्या प्रकाशकाकडून वाचनसाहित्याबाबत सभासद ग्रंथालयातील वाचकांना योग्य स्वरूपाची सेवा व सुलभता प्राप्त करण्यास मदत झाली. INDEST- Consortium च्या माध्यमातून सभासदत्व स्वीकारणाऱ्या महाविद्यालयांना थोड्याच खर्चात अनेक ऑनलाईन वाचनसाहित्य व नियतकालिकांचा अनुभव घेणे शक्य झाले. अशा प्रकारे ऑनलाईन वाचनसाहित्याचे विविध स्वरूपाचे फायदे कोणत्याही महाविद्यालयांना INDEST- Consortium चे सभासदत्व स्वीकारण्यास पुरेसे आहे.

INDEST- Consortium च्या वाचनसाहित्याचा अनुभव घेणे त्यांच्या सभासदांना शक्य आहे. INDEST- Consortium च्या सभासदांनाच अर्थसूचक व्यूहात्मक आणि मोठ्या स्वरूपात माहिती प्रस्थापित करण्यास वाचनसाहित्याचा अनुभव घेणे अत्यंत कमी रक्कम खर्च करून मिळवता येतो. परंतु ऑनलाईन नियतकालिकांचे वर्गणी भरून सभासदत्व स्वीकरण्याअगोदर खालील गोष्टींची पूर्तता होणे ग्रंथालयांना महाविद्यालयाकडून अपेक्षित असते; परंतु त्याची पूर्तता होत नाही.

- ग्रंथालयातील काही संगणकांना ऑनलाईन वाचनसाहित्य वापराचे अधिकार (I.P. Address) प्रस्थापित करणे.
- संगणकामध्ये लोकल एरिया नेटवर्कची (LAN) रचना करणे.
- लॅनमधील सर्व संगणकामध्ये इंटरनेटचे कनेक्शन प्रस्थापित करणे.
- काही संगणकांमध्ये प्रिंट काढण्याची सुविधा असणे आवश्यक असते.
- संगणक चांगल्या स्थितीत ठेवून ठरावीक कालावधीनंतर बॅकअप घेणे आवश्यक असते.

## INDEST-Consortium चे सभासदत्व

INDEST-Consortiumच्या साहाय्याने सभासदत्व स्वीकारणाऱ्या महाविद्यालयांना ऑनलाईन वाचनसाहित्याचा वापर प्राप्त होऊ शकतो. तसेच INDEST-Consortium च्या माध्यमातून सभासद महाविद्यालयीन ग्रंथालयांना ऑनलाईन वाचनसाहित्य किमतीत मोठ्या प्रमाणात सूट/ सवलत मिळू शकते.

INDEST-Consortiumच्या सभासदत्वाचे तीन प्रकार पडतात. प्रत्येक सभासद प्रकारानुसार त्यातील वाचनसाहित्याच्या वापराबाबतच्या वर्गणीच्या श्रेणी उपलब्ध होतात, तसेच प्रत्येक सभासदत्वाचे वैशिष्ट्य वेगळ्या स्वरूपात आढळून येते.

**(१) मुख्य सभासद महाविद्यालये**

केंद्र सरकारच्या आर्थिक निधीतून भारतात कार्यरत असणाऱ्या अठ्ठावीस महाविद्यालयांनी प्रथमत: INDEST-Consortium चे सभासदत्व स्वीकारलेले आहे. ह्यामध्ये आय.आय.टी. (IIT), आय.आय.एस.(IIS).एन.आय.टी. (NIT), आय.आय.आय.टी. (IIIT), आय.आय.एम (IIM), आय.एस.एम. (ISM), एस.एल.आय.इ.टी. (SLIET) आणि एन.आय.टी.आय.इ. (NITIE) महाविद्यालयाचा INDEST-Consortiumच्या सभासदत्व प्रकारातील ह्या मुख्य सभासदात समावेश होतो. ह्या महाविद्यालयांना Ministry of Human Resource Development च्या साहाय्याने इलेक्ट्रॉनिक्स वाचनसाहित्य वापरासाठी consortium च्या आय.आय.टी. दिल्लीतील मुख्य शाखेत आर्थिक निधी पुरविला जातो.

**(२) AICTE च्या आर्थिक निधीतून कार्यरत असणारे सभासद**

ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशनच्या आर्थिक साहाय्याने INDEST-Consortium सभासदत्व स्वीकारणे बहुतांशी अभियांत्रिकी महाविद्यालयांना शक्य झाले आहे. AICTE ची मान्यता असणाऱ्या महाविद्यालयांना INDEST-Consortium ऑनलाईन वाचनसाहित्याची वार्षिक वर्गणी भरून वापर करता येऊ शकतो.



**(३) स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये**

AICTE व UGC ने मान्यता प्राप्त केलेल्या कोणत्याही महाविद्यालयांना INDEST-Consortium चे सभासदत्व मिळू शकते व त्यातील सहभागी असणाऱ्या ग्रंथालयांना ऑनलाईन वाचनसाहित्याचा वापर करता येऊ शकतो.

## INDEST-Consortium ची सभासदत्व पात्रता

INDEST-Consortium चे सभासदत्व स्वीकारणाऱ्या महाविद्यालयांना १००० रु. वार्षिक फी भरावी लागते. ह्याचे सभासदत्व स्वीकारणे हे कोणत्याही स्वायत्त व शासनाच्या निधीतून कार्यरत असणारी महाविद्यालये / शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था / महाविद्यालये किंवा विद्यापीठांना एक किंवा अनेक वाचनसाहित्यांचा वापर त्या वाचनसाहित्याची वार्षिक वर्गणी भरून करता येऊ शकतो.

## INDEST-Consortium च्या सभासदात्वाद्वारे प्राप्त होणाच्या ऑनलाईन वाचनसाहित्याचे प्रकार

INDEST च्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या ऑनलाईन वाचनसाहित्याचे दोन प्रकार पडतात :

(१) Full Text Electronics Resources : संक्षिप्त वाचनसाहित्य
(२) Bibliographic Databases : सारांश स्वरूपातील वाचनसाहित्य

**(१) संक्षिप्त स्वरूपातील ऑनलाईन वाचनसाहित्य**

INDEST-Consortiumचे सभासदत्व स्वीकारून संक्षिप्त स्वरूपाच्या ऑनलाईन वाचनसाहित्याचा अनुभव वाचकांना प्राप्त होऊ शकतो. संक्षिप्त ऑनलाईन वाचनसाहित्याच्या साहाय्याने वाचकांना त्या वाचनसाहित्यातील लेखांची अनुक्रमाणिका, लेखांच्या संदर्भसूची, लेखांचा सारांश व त्या लेखांचे संक्षिप्त स्वरूप प्राप्त होते. वाचकांना उपलब्ध वाचनसाहित्यातील संपूर्ण लेख वाचनाचा अनुभव प्राप्त होतो.

**(२) सारांश स्वरूपातील ऑनलाईन वाचनसाहित्य**

सारांश स्वरूपातील ऑनलाईन वाचनसाहित्याचा अनुभव प्राप्त करण्यासाठी INDEST-Consortium चे सभासदत्व स्वीकारणे किंवा ऑनलाईन प्रकाशक सभासदत्व स्वीकारणे आवश्यक नसते. ह्यामध्ये वाचकांना मासिकातील लेखाचा सारांश देण्यात आलेला असतो. तसेच संक्षिप्त स्वरूपातील ऑनलाईन स्वरूपाच्या आवृत्तीचे Hyper Link त्याच लेखात देण्यात आलेली असते.

## संदर्भसूची

(1) Indian Society for Technical Education News Letter, Vol. XXIII No.5 Sept./Oct. 2003.
(2) University News, Vol.44 No.31 July-Aug.06 :2006.
(3) http://panit iitd.ac. in/indoot.
(4) INDEST: Consortium E-resources Mannual : Vol.4, 2005, New Delhi.

INDEST-AICTE : CONSORTIUM च्या साहाय्याने भारतातातील तंत्रशिक्षण संस्था व अभियांत्रिकी महाविद्यालयांना खालील स्वरूपात ऑनलाईन वाचनसाहित्य वार्षिक वर्गणीद्वारे उपलब्ध होऊ शकते.

| क्र. | ऑनलाईन वाचनसाहित्य | वार्षिक वर्गणी |
|---|---|---|
| 1. | ABF/INFORM Complete. | 3,78.000 |
| 2. | ACM Digital Library | ** |
| 3. | ASCE Journals* | 1,08,640 |
| 4. | ASME Journals (TAMR)* | 97,920 |
| 5. | Capitaline | ** |
| 6. | COMPENDX & INSPEC for cor.II | 10,00,190 |
| 7. | COMPENDX INSPEC for cat III | 8,33,520 |
| 8. | DEL* | 39,170 |
| 9. | ESDU* | 51,410 |
| 10. | Euromonitor (GMID) | 2,93,830 |
| 11. | IEL Online (single access)* | 2,17,060 |
| 12. | IEL Online (5sim access)* | 13,42,050 |
| 13. | IEL Online (15 sim access) | 35,39,590 |
| 14. | Indian standards (for first year) | 3,97,800 |
| 15. | Indian standards (subsequent year) | 1,59,120 |
| 16. | Math sci Net | 14,400 |
| 17. | Nature | ** |
| 18. | Proquest Science Journals | 2,52,000 |



| क्र. | ऑनलाईन वाचनसाहित्य | वार्षिक वर्गणी |
|---|---|---|
| 19. | Science Direct Option 1 | 19,23,470 |
| 20. | Science Direct Opetion 2 | 10,99,040 |
| 21. | Springer's link (option F-5 20 Times) | 1,67,590 |
| | Annual membership fee | 5,000.00 |

वरील तक्त्यात * हे चिन्ह असलेले वाचनसाहित्य ग्रंथालये INDEST - Consortium ची सभासद फी न भरता वापरू शकतात.

वरील तक्त्यात ** ह्या चिन्हातील ऑनलाईन वाचनसाहित्याची किंमत ग्रंथालयांना त्यांच्या मागणीनुसार IIT, Delhi ग्रंथालयातील ग्रंथपाल ह्यांच्यांशी संपर्क साधल्याने प्राप्त होऊ शकेल.

अनु.क्र. ३, ४, ८, ९, ११ आणि १२ ह्या क्रमावरील वाचनसाहित्य ग्रंथालयांना कुठल्याही महिन्यापासून ऑगस्टपर्यंत वर्गणी फी भरून सुरू करता येते.

❑❑❑

# वाचनसंस्कृती संवर्धनात आकाशवाणीचे योगदान

डॉ. एस. आर. बाहेती / प्रा. अ. श. सोनोने

*जनसामान्यांकरिता ज्ञान व माहितीचे प्रसारण विस्तृत भागात आकाशवाणीद्वारे होत असते. ज्या व्यक्ती निरक्षर आहेत, अंध आहेत त्यांच्याकरिता तर रेडिओ हे माहिती व मनोरंजनाचे एकमेव महत्त्वाचे माध्यम आहे. दूरचित्रवाणीच्या लोकप्रियतेमुळे आकाशवाणीच्या श्रोतृवर्गात घट होईल ही शंका होती; परंतु आकाशवाणीने हे आव्हान स्वीकारून Informative Programmeची आखणी करून आपले अस्तित्व आजही अबाधित राखले आहे.*

*प्रस्तुत लेखात लेखकांनी नभोवाणीचा इतिहास, आकाशवाणीची सुरुवात, प्रसारभारतीची स्थापना कशी झाली हे विशद केले आहे. तसेच आकाशवाणी प्रसारण सेवेची उद्दिष्टे नमूद करून वाचनसंस्कृती संवर्धनात आकाशवाणीचे योगदान कसे आहे, विशेषत: अकोला आकाशवाणी केंद्रावरून वाचनसंस्कृतीविषयक कोणकोणते कार्यक्रम प्रसारित करण्यात येतात याचे अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. तसेच आकाशवाणी आणि ग्रंथालयाची माहितीनिर्मिती व प्रसारणामधील परस्पर भूमिका, माहिती व ज्ञान सोसायटीच्या निर्मितीमध्ये कशी महत्त्वपूर्ण ठरणारी आहे हे सांगितले आहे.*

## प्रस्तावना

सर्वसाधारण जनतेच्या श्रवणासाठी आकाशवाणी कार्यक्रम प्रक्षेपित करण्याची क्रिया या अर्थाने रेडिओ प्रक्षेपण ही संज्ञा वापरली जाते. विखुरलेल्या व योग्य ग्रहण-साधने जवळ असलेल्या श्रोत्यांकरिता मनोरंजन, वेगवेगळ्या माहितीचे प्रसारण, शैक्षणिक



कार्यक्रम व इतर प्रसंगविशेषी कार्यक्रम यांचे एकाच वेळी प्रक्षेपण करणे हे रेडिओ प्रक्षेपणाचे महत्त्वाचे कार्य आहे. रेडिओ प्रक्षेपणात फक्त ध्वनीचे प्रक्षेपण करण्यात येते तर दूरचित्रवाणी प्रक्षेपणात ध्वनिदृश्य यांचे संयुक्त प्रक्षेपण करण्यात येते. दूरचित्रवाणीच्या लोकप्रियतेचा रेडिओ श्रोत्यांवर परिणाम होईल अशी शंका होती, ही शंका काही अंशी खरी ठरली असली तरी, आजही आकाशवाणीचे मोठ्या प्रमाणावर श्रोते आहेत नव्हे एफ.एम.मुळे तर या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे ऑडियन्स रिसर्च ब्युरोच्या सर्व्हेक्षणानुसार दिसून आले आहे. जनसामान्यांकरिता ज्ञान व माहितीचे प्रसारण करण्याकरिता विस्तारित भूभागात माहितीचे प्रसारण रेडिओच्या माध्यमातून होते. ज्या व्यक्ती वाचू शकत नाहीत तसेच जे अंध आहेत अशा लोकांकरिता रेडिओ हे माहिती व मनोरंजनाचे एकमेव महत्त्वाचे माध्यम आहे. माहिती शोधण्यासाठी कुठलाही प्रयत्न न करता श्रोत्याला हवी असलेली माहिती देण्याचे कार्य रेडिओ करीत आहे. एक प्रकारे ग्रंथालय व रेडिओ दोहोंचीही कार्ये माहितीचे प्रसारण करणे हे आहे. प्रस्तुत लेखात अकोला आकाशवाणी केंद्राद्वारे वाचनसंस्कृती संवर्धनाशी निगडित प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांचा अभ्यास केलेला आहे.

## नभोवाणीचा इतिहास

मार्कोनी या इटालियन शास्त्रज्ञाने १८८५ साली बिनतारी संदेशयंत्रणेचा शोध लावला. या यंत्रणेचा वापर करून स्टुडिओमध्ये उच्चारल्या गेलेला शब्दसंदेश जशाचा तसा जगात कुठेही पोहचविता येऊ शकतो हे सिद्ध झाले. मार्कोनी यांनी १९१४ साली इंग्लंडवरून ऑस्ट्रेलियाला पहिला रेडिओ संदेश यशस्वीपणे पाठविला. या संदेशामुळे खऱ्या अर्थाने रेडिओ केंद्राच्या निर्मितीला चालना मिळाली. जगातील पहिले रेडिओ केंद्र १९२१ साली अमेरिकेतील सेंट पिटसबर्ग या शहरी स्थापन करण्यात आले. १९१९ मध्ये RCA (रेडिओ कॉर्पोरेशन ऑफ अमेरिका) या संघटनेची स्थापना अमेरिकेत करण्यात आली. त्यानंतर २ नोव्हेंबर १९२० रोजी KDKA हे अमेरिकतले पहिले रेडिओ स्टेशन कार्यान्वित झाले. युनायटेड किंगडमचा विचार करता ब्रिटनमध्ये १९१९-मध्ये मार्कोनीला चेम्सफोर्ड येथून प्रायोगिक प्रसारणासाठी परवाना मिळाला. १९२२ साली लंडनमधील मार्कोनी हाऊसमध्ये इंग्लंडमधील पहिले रेडिओ केंद्र स्थापन झाले; त्याचे नाव 2LO असे होते. रेडिओ केंद्राच्या क्रांतीला खऱ्या अर्थाने कारणीभूत झाले ती म्हणजे लंडनमध्ये १४ नोव्हेंबर १९२२ रोजी झालेली BBCची स्थापना हे होय. स्थापनेनंतर BBCने ब्रिटनमधील सर्व रेडिओ केंद्रांचे प्रक्षेपण तसेच 2LO हे केंद्र प्रसारणासाठी आपल्या ताब्यात घेतले.

## नभोवाणीची भारतातील वाटचाल

भारतात संघटित स्वरूपाच्या नभोवाणी प्रसारणाला प्रारंभ झाला, तो दिवस म्हणजे २३ जुलै १९२७ हा होय. या दिवशी भारतातील पहिले नभोवाणी केंद्र मुंबई येथे इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी या खाजगी कंपनीने सुरू केले. या केंद्राचे उद्घाटन त्या वेळचे व्हॉईसरॉय लार्ड इरवीन यांच्या हस्ते करण्यात आले होते. सुरुवातीला अपोलो बंदरावरील आर्विन हाऊसच्या तिसऱ्या मजल्यावर मुंबई केंद्र कार्यान्वित होते. यामध्ये एक मोठा हॉल, एक मोठा आणि एक छोटा स्टुडिओ आणि एक कंट्रोल रूम एवढाच या केंद्राचा पसारा होता. कर्मचाऱ्यांची संख्याही १५-१६च्या आसपास होती. या केंद्रातला ब्रॉडकास्टिंग स्टुडिओ वरळी येथे उभारलेल्या प्रक्षेपकाशी टपाल आणि तार खात्याच्या लाईन्सनी जोडण्यात आला होता. त्यानंतर पाच आठवड्यांनी म्हणजे २६ ऑगस्ट १९२७ रोजी IBCने आपले दुसरे केंद्र कोलकाता येथे सुरू केले. या केंद्राचे उद्घाटन त्या वेळचे बंगालचे गव्हर्नर सर स्टॅन्ले जॅक्सन यांनी केले. या वेळी इंडियन ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशन प्रसारणाचे कार्य करण्यात अग्रेसर भूमिका वठवीत होती. त्या वेळी IBCचे अधिकृत भागभांडवल १५ लाख रुपये होते. त्यापैकी ६ लाख रुपये सुरुवातीलाच खर्ची पडले. कंपनीचे उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे रेडिओ संचावर आकारण्यात येणारे परवाना शुल्क हे होते. १९२८ मध्ये रेडिओसंचांची संख्या सहा हजार होती. त्यामध्ये वर्षाला एक हजाराचीही भर पडत नव्हती. IBCचा मासिक खर्च ३३ हजार रुपये होतो, त्यामुळे संचित तोट्यात भर पडून शेवटी १ मार्च १९३० रोजी कंपनी दिवाळखोर झाली.

IBC ने दिवाळखोरी जाहीर केली त्याचे श्रोत्यांत तीव्र पडसाद उमटले. प्रसारण सुरू ठेवण्यासाठी सरकारकडे अनेक निवेदने येऊ लागली. शेवटी १ एप्रिल १९३० रोजी IBCची केंद्रे, मालमत्ता व कर्मचाऱ्यांसह केंद्रशासनाने आपल्या ताब्यात घेतली. कंपनीचे नाव बदलून Indian State Broadcasting Service असे नामांतर करण्यात आले. ८ जुलै १९३६ रोजी ISBCचे 'ऑल इंडिया रेडिओ' असे नामांतर करण्यात आले. या नावाला चांगला प्रतिसाद मिळाला. नोव्हेंबर १९३७ मध्ये 'ऑल इंडिया रेडिओ'चा समावेश माहिती आणि दळणवळण खात्याच्या अंर्तगत करण्यात आला.

## आकाशवाणीची सुरुवात

म्हैसूर संस्थानाने १९३५मध्ये एक रेडिओ केंद्र सुरू केले. या केंद्रास संस्थानने आकाशवाणी हे नाव दिले. हेच नाव पुढे भारत सरकारने देशातील सर्व रेडिओ केंद्रांसाठी स्वीकारले आणि रेडिओ केंद्राला भारतामध्ये 'आकाशवाणी' असे संबोधले जाऊ लागले. ते आजतागायत चालू आहे. परदेशी वृत्तपट व इंग्रजीमधून प्रसारित होणाऱ्या वार्तापटाच्या



वेळी मात्र 'ऑल इंडिया रेडिओ' असे संबोधले जाऊ लागले. देशातील विस्तीर्ण विभागात तसेच दुर्गम भागापर्यंत आकाशवाणी विविध प्रकारच्या माहिती व मनोरंजनाच्या सेवा श्रोत्यांपर्यंत पोहचविते. आकाशवाणी नित्य नवनवे उपक्रम हाती घेत असते. कार्यक्रमातील नावीन्य हा प्रत्येक केंद्राचा प्रधान हेतू असतो.

## भारतातील आकाशवाणी केंद्रांची स्थिती

सद्य:स्थितीत संपूर्ण भारतामध्ये एकूण २१५ आकाशवाणी केंद्रे कार्यरत आहेत. महाराष्ट्रामध्ये औरंगाबाद, अकोला, मुंबई, जळगाव, नागपूर, परभणी, पुणे, रत्नागिरी, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, अहमदनगर, नाशिक, नांदेड, धुळे, चंद्रपूर, बीड, उस्मानाबाद, यवतमाळ अशी एकूण २० केंद्रे कार्यरत आहेत. पंचवार्षिक योजनेनुसार प्रत्येक पंचवार्षिक योजनेत निर्माण झालेल्या रेडिओ केंद्रांची स्थिती पुढीलप्रमाणे -




वरील आलेखावरून लक्षात येते की, रेडिओ केंद्रांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार १९८९ ते २००० या कालावधीत झाल्याचे दिसून येते.

## प्रसारभारतीची स्थापना

आकाशवाणी व दूरदर्शनला स्वायत्तता देण्यासाठी ऑगस्ट १९७७ मध्ये नामवंत पत्रकार बी. जी. वर्गीस यांच्या अध्यक्षतेखाली एका कार्यकारी गटाची स्थापना करण्यात आली होती. या गटाने २४ फेब्रुवारी १९७७ रोजी आपला अहवाल सरकारला सादर केला. या अहवालात वर्गीस यांनी आकाशभारती या नावाच्या स्वायत्त राष्ट्रीय ट्रस्टची स्थापना करावी अशी मुख्य शिफारस करण्यात आली होती. संसदेत या अहवालावर चर्चा झाल्यानंतर १६ मे १९७९ला त्या काळचे माहिती प्रसारण मंत्री श्री. लालकृष्ण

अडवाणी यांनी स्वायत्त प्रसारभारती महामंडळ स्थापन करण्याबाबतचे विधेयक संसेदत मांडले. मात्र १९७९ मध्ये लोकसभा विसर्जित झाल्याने हे विधेयक बारगळले. ऑगस्ट १९९० मध्ये सुधारित प्रसारभारती विधेयकाला लोकसभा व राज्यसभेने मंजुरी दिली. १० सप्टेंबर १९९० ला राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केली; परंतु त्याबाबतची अधिसूचना न काढल्यामुळे हा कायदा बासनात पडला.

१९९० मध्ये प्रसारभारती कायद्याचा आढावा घेण्यासाठी सरकारने सेनगुप्ता समितीची स्थापना केली. या समितीच्या अहवालाला ऑक्टोबर १९९०मध्ये केंद्रातील संयुक्त आघाडी सरकारने मूळ कायद्यात अनेक महत्त्वाचे बदल करून अध्यादेश काढला. कायद्यानुसार २३ नोव्हेंबर १९९७ रोजी प्रसारभारती मंडळ उदयास आले. तेव्हापासून आकाशवाणी व दूरदर्शन हे या मंडळाच्या नियंत्रणाखाली कार्य करीत आहेत. प्रसारभारतीमुळे या क्षेत्रात स्वायत्ततेला चालना मिळून वेगवेगळी विद्यापीठे, खाजगी संस्था यांनासुद्धा आपली खाजगी आकाशवाणी केंद्रे सुरू करण्याकरिता परवानगी देण्यात आली.

## आकाशवाणी प्रसारणसेवेची उद्दिष्टे

(१) सूचना (Information),
(२) मनोरंजन (Entertainment),
(३) शिक्षण (Education).

आकाशवाणी कोडमध्ये स्पष्ट सांगितले आहे की, आकाशवाणीने श्रोत्यांना मनोरंजनाबरोबर वेगवेगळ्या विषयांवरची माहिती देणे, चालू घडामोडींची माहिती देणे, शिक्षणासंबंधी योग्य कार्यक्रम सादर करणे, आदींना प्राधान्यक्रमाने प्रसारणासाठी महत्त्व द्यावे. आकाशवाणीच्या कार्यक्रमाची लोकप्रियता एवढी आहे की कार्यक्रमाबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढली आहे. याचे चांगले उदाहरण म्हणजे पंजाबमधील हरित क्रांतीच्या यशामागे अनेक प्रमुख कारणांपैकी एक कारण म्हणजे जालंधर आकाशवाणी-द्वारा प्रसारित 'देहाती' हा कार्यक्रम असल्याचे मानले जाते. केरळमध्ये एका तांदळाचे नाव Radio-Rice असे ठेवले गेले आहे. यावरून आकाशवाणी जनसामान्यांसाठी माहिती प्रसारण सेवाकार्य अत्यंत परिणामकारकपणे करीत असल्याचे स्पष्ट होते.

## अकोला आकाशवाणी केंद्र

अकोला हे महाराष्ट्रातील मध्यवर्ती जिल्ह्याचे ठिकाण असून खऱ्या अर्थाने देशाच्यासुद्धा केंद्रभागी आहे. अकोल्यामध्ये १ मे १९९२ या महाराष्ट्र दिनी अकोला आकाशवाणीच्या केंद्र प्रसारणाला प्रारंभ झाला. केंद्राच्या स्थापनेपासूनच स्थानीय



भाषा तसेच साहित्यविषयक कार्यक्रमाला प्राधान्य देण्यात आले. खासकरून मराठी भाषा, मराठी साहित्य, वऱ्हाडी साहित्याशी निगडित अनेक कार्यक्रम अकोला आकाशवाणी प्रसारित करीत आहे. आकाशवाणी वाचनसंस्कृती रुजविण्यासाठीसुद्धा वेगवेगळ्या प्रकारच्या कार्यक्रमांचे प्रसारण वेगवेगळ्या वेळी करीत असते. अकोला आकाशवाणीचे हे सर्व कार्यक्रम अकोला, वाशिम, अमरावती आणि बुलढाणा या जिल्ह्यातील ३५ ते ४० लाख श्रोत्यांपर्यंत पोहचतात, असे ऑडियन्स रिसर्च ब्युरोच्या सर्व्हेक्षणानुसार दिसून आले आहे.

## अकोला आकाशवाणीची वाचनसंस्कृतीविषयक साहित्य सदरे

### (१) साहित्यकी

आठवड्यातून एकदा प्रसारित होणारा साहित्यकी या नावाचा कार्यक्रम अकोला आकाशवाणी प्रसारित करते. या कार्यक्रमामध्ये विविध साहित्याची माहिती देणे व साहित्यिकांचे साहित्य प्रसारित करणे याला प्राधान्य दिले जाते. यामध्ये ग्रामीण भाषेतील, बोली भाषेतील साहित्याला विशेष प्राधान्य दिले जाते. याच कार्यक्रमांतर्गत वऱ्हाडी साहित्यासाठी 'वऱ्हाडी मायबोली' हा कार्यक्रम वऱ्हाडी साहित्यिकांच्या साहित्य-प्रसारणासाठी २००४ पासून सुरू केला आहे. या कार्यक्रमामुळे वेगवेगळ्या साहित्याची माहिती श्रोत्यांना मिळते.

### (२) अक्षरयात्रा

'जे जे वाचनीय ते ते श्रवणीय' हे लक्षात घेऊन या कार्यक्रमाची आखणी आकाशवाणीने केली आहे. या सदरामध्ये प्रसिद्ध वाचनसाहित्याची निवड प्रसारणासाठी करण्यात येते आणि निवड करण्यात आलेल्या वाचनसाहित्याचे प्रसारण करण्यात येते. यामध्ये कादंबरी, नाटक, काव्य यांचे वाचन केले जाते. आतापर्यंत भंडारवाडी (बाजीराव पाटील), राजमाता (सुहास कुलकर्णी), कैफ (अनिल फुंडकर), सैलझाडा (नामदेव कांबळे), डेबू (विठ्ठल वाघ) या कादंबऱ्यांचे क्रमशः वाचन अकोला आकाशवाणी या केंद्राद्वारे करण्यात आले. त्याचबरोबर वेगवेगळ्या केंद्रांवर सादर झालेल्या कादंबऱ्यांचे रेकॉर्डिंग प्रसारणसुद्धा करण्यात आले. त्यामध्ये कोसला (पुणे), गोतावडा (कोल्हापूर), मेड इन इंडिया (नागपूर), बारोमास (जळगाव), मृत्युंजय (जळगाव), आदी कादंबऱ्यांचा समावेश आहे. वरील कादंबऱ्यांच्या क्रमशः प्रसारणामुळे ग्रंथालयामध्ये कादंबरीच्या वाचकांच्या मागणीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली, त्याचबरोबर खपामध्येसुद्धा वाढ झाल्याचे दिसून आले.

**(३) अधोरेखिते**

अकोला आकाशवाणीचे प्रसिद्ध व लोकप्रिय असे सदर म्हणजे अधोरेखिते हे होय. या सदरामुळे असंख्य श्रोत्यांना वाचनाची प्रेरणा मिळाली आहे. या सदरात श्रोत्याने एखाद्या पुस्तकातील चांगला प्रसंग, चांगले वाक्य, निसर्गवर्णन केलेला भाग आकाशवाणीकडे पाठवायचा. निवड झालेल्या श्रोत्यांचे त्यांच्या नावासह प्रसारण या कार्यक्रमात करण्यात येते. या कार्यक्रमामुळे वेगवेगळ्या ग्रंथांतील महत्त्वाची वाक्ये, प्रसंग यावर प्रकाश पडल्यामुळे त्या ग्रंथांची सर्व श्रोत्यांना माहिती मिळते. अशा ग्रंथांना वाचकाभिमुख करण्याचे कार्य आकाशवाणी करीत आहे.

**(४) परिक्रमा**

अकोला आकाशवाणीद्वारे प्रसारित या सदरामध्ये साहित्यिक जगताचा आढावा घेण्यात येतो. यामध्ये प्रकाशन विश्व, लेखकांचा परिचय, संहितालेखन, वाचन, चर्चा, कवितावाचन, ललित गद्य चर्चा, भाषणे, ग्रंथपरीक्षणे, आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. हा कार्यक्रम महिन्यातून एकदा घेण्यात येतो. त्यामुळे श्रोत्यांना साहित्यिक जगताची माहिती मिळते.

**(५) मंथन**

अकोला आकाशवाणीद्वारे दररोज प्रसारित होणारा हा कार्यक्रम आहे. यामध्ये थोर व्यक्तींच्या विचारांचे प्रसारण, त्याचबरोबर सुविचारांचे प्रसारण करण्यात येते. प्रसारित झालेल्या विचारवंतांच्या विचारांबद्दल श्रोत्यांच्या प्रतिक्रियासुद्धा मागविल्या जातात; ज्याला श्रोत्यांचे अनुभव असे संबोधले जाते. यासाठी श्रोत्यांनी आपापले अनुभवसुद्धा लिहून आकाशवाणीकडे पाठवावेत असे आवाहन केले जाते व त्याचे प्रसारण करण्यात येते.

**(६) युवावाणी**

गत एक वर्षापासून अकोला आकाशवाणी हा कार्यक्रम प्रसारित करते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे नवोदित लेखक, कवी यांना आपली कथा, कविता सादर करण्याची संधी आकाशवाणी उपलब्ध करून देते. या कार्यक्रमामुळे आकाशवाणीने अनेक नवीन कवींना, लेखकांना प्रसिद्धीच्या झोतात आणण्याचे कार्य केले आहे. त्याचबरोबर युवकांसाठी वेगवेगळ्या स्पर्धापरीक्षांची माहिती, व्यवसाय मार्गदर्शन, शासनांच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती या कार्यक्रमामधून दिली जाते. त्याचबरोबर वेगवेगळ्या क्षेत्रांत उत्तम कामगिरी करणाऱ्या युवकांच्या मुलाखतीही प्रसारित करण्यात येतात.



**(७) कथा अभिवाचन**

या कार्यक्रमामध्ये श्रुतिकथांचे सादरीकरण करण्यात येते. बऱ्याच वेळा कथांचे नाट्य रूपांतरण करून त्यांचे प्रसारण करण्यात येते. त्यामुळे श्रोत्यांना कथा श्रवणातून मनोरंजनसुद्धा होते. त्याचबरोबर पार्श्वसंगीत देऊन कवितांचे अभिवाचन करण्यात येते. आतापर्यंत रवींद्रनाथ टागोर, विंदा करंदीकर, उ. रा. गिरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आदींच्या कवितांचे अभिवाचन करण्यात आले आहे.

**(८) वानप्रस्थ**

या सदरामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. खासकरून ज्येष्ठ नागरिकांच्या साहित्य आविष्काराचे प्रसारण या कार्यक्रमातून करण्यात येते. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक असणारी वेगवेगळ्या प्रकारची माहिती आणि त्यांच्यासाठी असणाऱ्या योजना यांची माहितीही कार्यक्रमातून दिली जाते.

**(९) माझे वाचन (फोन इन कार्यक्रम)**

अकोला आकाशवाणीचा हा लोकप्रिय कार्यक्रम असून या सदरामध्ये श्रोते आकाशवाणीशी थेट संवाद साधतात. या कार्यक्रमामध्ये माहितीच्या आदानप्रदानाबरोबरच संगीताचा आस्वादसुद्धा श्रोत्यांना मिळतो. या कार्यक्रमामध्ये माझे वाचन हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय घेऊन श्रोत्यांची वाचन अभिरुची जाणून घेतली जाते. यामध्ये तुमची आवडती पाच पुस्तके सांगा, तुमच्यावर कोणत्या लेखकाचा प्रभाव आहे, तुमच्या आवडता लेखक कोणता, वाचनासाठी पुस्तक कसे निवडता, आदी माहिती मुलाखतीद्वारे घेण्यात येते. या कार्यक्रमामध्ये कधीकधी साहित्यिकांना निमंत्रित करण्यात येऊन त्यांच्या वाचनाशी निगडित मुलाखती घेण्यात येतात. जेणेकरून तो साहित्यिक कुठल्या लेखकाच्या पुस्तकाचा आधार घेऊन घडला याची माहिती श्रोत्यांना उपलब्ध करून दिली जाते. श्रोत्यांना साहित्यिकांच्या मुलाखतीमधून त्यांच्या आवडीच्या पुस्तकांबद्दल वाचनाची प्रेरणा मिळते.

**(१०) ग्रंथालयविषयक कार्यक्रम**

अकोला आकाशवाणीद्वारे दरवर्षी विश्व पुस्तक दिन, राष्ट्रीय ग्रंथ सप्ताह, रंगनाथन जयंती, पुण्यतिथी, आदींवर तज्ज्ञ ग्रंथपालांची व्याख्याने, परिचर्चा, मुलाखत, आदींचे प्रसारण करण्यात येते. खासकरून आकाशवाणी केंद्रातील काही कर्मचारी ग्रंथालय चळवळीशी प्रत्यक्ष सहभागी असल्यामुळे त्यांचा सक्रिय सहभाग यामध्ये असतो.

वरील सर्व कार्यक्रमावरून आकाशवाणी खऱ्या अर्थाने बुक टॉकचे कार्य करीत असल्याचे दिसून येते.

## आकाशवाणी कार्यक्रमांचे फायदे

(१) जे लोक निरक्षर आहेत, आंधळे आहेत, जे वाचन करू शकत नाही अशा लोकांसाठी बोलक्या पुस्तकांचे काम आकाशवाणी करते.

(२) जे व्यावसायिक वाचनासाठी वेळ देऊ शकत नाही, ते आपले कार्य सुरू ठेवून रेडिओ ऐकू शकतात, त्यातून माहिती घेऊ शकतात.

(३) दूरदर्शनमध्ये मेंटल ॲक्टिव्हिटीला चालना मिळत नाही; परंतु आकाशवाणीच्या कार्यक्रमामुळे कल्पनाशक्तीला चालना मिळते.

(४) वरील उपक्रमांवरून समाजाला ग्रंथाबद्दल, वाचनाबद्दल जागरूक करण्याचे कार्य आकाशवाणी करीत असल्याचे दिसते.

(५) उत्तम साहित्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य आकाशवाणी करते. ज्या साहित्यकृतीची निवड आकाशवाणीने प्रसारणासाठी केली त्या साहित्यकृतीच्या विक्रीमध्येसुद्धा प्रचंड वाढ झाल्याचे दिसून आले.

(६) श्रोत्यांना वाचनाची प्रेरणा आकाशवाणीच्या वरील उपक्रमांतून मिळते.

(७) आकाशवाणीच्या वरील कार्यक्रमांतून नवीन कथालेखक, कवी यांना आपले साहित्य समाजापर्यंत पोहोचविण्याची संधी मिळते.

आकाशवाणीच्या वरील उपक्रमांवर नजर टाकल्यास आकाशवाणीचे वाचन-संस्कृती प्रसारामध्ये महत्त्वाचे योगदान असल्याचे दिसून येते. आकाशवाणी आणि ग्रंथालय यांनी संयुक्तपणे कार्य केल्यास वाचन चळवळ रुजविण्यात हे दोघेही महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. यासाठी काही शिफारशी पुढीलप्रमाणे -

## शिफारशी

(१) माहिती व ज्ञान सोसायटीच्या निर्मितीमध्ये आकाशवाणी व ग्रंथालयांनी त्या-त्या भागात वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून माहितीविषयक सामाजिक जागरूकता निर्माण करावी.

(२) आकाशवाणीने स्थानिक ग्रंथालयाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकणारे कार्यक्रम सादर करावे.

(३) वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी तरुणवर्गाला कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त सहभागी करून घ्यावे.

(४) ज्ञानसंवर्धनात ग्रंथालयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे यासाठी उपयोगी अशा कार्यक्रमांची आखणी करावी. त्याकरिता स्थानिक तज्ज्ञ ग्रंथपालांचे सहकार्य घेण्यात यावे.



(५) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तसेच रोजगाराच्या संधी या संदर्भात विविध ग्रंथालये आणि आकाशवाणीने संयुक्तपणे कार्यक्रम प्रसारित करावेत/ राबवावेत.

## उपसंहार

आकाशवाणी व ग्रंथालय दोन्हींचे एकसमान कार्य म्हणजे माहिती संप्रेषण हे होय. यासाठी आकाशवाणीलासुद्धा ग्रंथालयातील माहिती साधनांचा आधार अनिवार्यपणे घ्यावाच लागतो. दोहोंचेही कार्य परस्परपूरक असल्यामुळे वाचन चळवळ रुजविण्यात आकाशवाणी महत्त्वाचे योगदान देऊ शकते, हे वरील उपक्रमांवरून दिसून येते. वेगवेगळ्या आकाशवाणी केंद्रांनी अशा प्रकारच्या उपक्रमांना आपल्या कार्यक्रमांमध्ये प्राधान्याने वेळ दिला पाहिजे / समावेश केला पाहिजे.

## संदर्भसूची

(१) दळवी, विजय. मुलाखत : 'अकोला आकाशवाणीचे कार्यक्रम', मुलाखतकार अशोक सोनोने, आकाशवाणी केंद्र, अकोला, १५ ऑक्टोबर २००६.

(२) जोशी, लक्ष्मणशास्त्री, संपा. 'आकाशवाणी' मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोश, १९७६, खंड क्र. १, पृ. ८९२,८९४.

(३) कोरडे पुरुषोत्तम, मराठीतील नभोवाणी पत्रकारिता : इतिहास आणि स्वरूप, पुणे श्रीविद्या प्रकाशन, २००३.

(४) दास्ताने, संतोष, महाराष्ट्र : २००६, पुणे : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, २००६.

(५) "Radio & its Uses : Old & News ed. Compton Encyclopedia, Chichago : F. E. Compton Company, 1980, Vol. 21, P. 43 to 47.

(६) "Uses & Regulations of Radio". Ed. New Standard Encyclopedia, Chicago, Standard Educational Corporation, 1983, Vol.12, P. 34-37.

❑❑❑

# पत्रव्यवहार

पत्र ४

डॉ. राजेंद्र कुंभार, कार्यकारी संपादक, ज्ञानगंगोत्री यांस,

स.न.वि.वि. आपण माझी शं. ग. दाते जन्मशताब्दी विशेषांकावरील तीन पत्रे प्रसिद्ध केलीत याबद्दल आपले शतशः आभार. ही पत्रे लिहिण्यास बराच विलंब झाला. त्यामुळे ती प्रसिद्ध होतील की नाही याची शंकाच होती व त्यांतील काही मजकूर फक्त संपादकांसाठी होता. त्याकडे वाचक दुर्लक्ष करतील अशी आशा बाळगतो. मी ही पत्रे सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातूनच लिहिली आहेत; पण विशेषांकात काही मुद्दे किंवा बाबी अशा आहेत की ज्यांची उत्तरे किंवा माहिती फक्त मीच देऊ शकेन. उदा. अभ्यासकांना किंवा संशोधकांना सूची तयार करण्यापर्यंत माहिती असते; पण तिचे मुद्रण, पुनर्मुद्रण, रॉयल्टी इत्यादी (Behind the scenes) गोष्टी त्यांना माहीत नसतात. त्यातून काही टीका होते. हीच गोष्ट सूचिनिर्मितीच्या कालखण्डबाबत. ज्या काळात ग्रंथसूचीचा पहिला खण्ड प्रसिद्ध झाला (१९४४) त्याची कल्पनासुद्धा करणे आजच्या पिढीला अवघड आहे. श्री. सतीश डोंगरे यांनी या विषयाला आपल्या लेखात हात घातला आहे. पण त्यांनाही त्या काळाची नेमकी कल्पना नाही. या अज्ञानातूनच ग्रंथांचा आकार इंचात का यासारखे प्रश्न उद्‌भवले. श्री. डोंगरे यांनी आपल्या लेखात म्हटले आहे की त्या काळात सूचिकार्याला सामाजिक प्रतिष्ठा नव्हती (पृ.१५). सामाजिक हा शब्द जरा व्यापक आहे. त्या अर्थाने ते विधान खरेही असेल. कारण सामान्य लोकांचा सूचीशी इतका संबंध येत नाही; पण 'साहित्यक्षेत्र' या मर्यादित अर्थाने हे विधान तितकेसे खरे नाही. पहिल्या सूचीच्या प्रकाशनच्या घरगुती समारंभास ४/५ लोक उपस्थित होते. त्यांत म.म. द. वा. पोतदार, चित्राव शास्त्री अशी मंडळी होती व ग्रंथ प्रसिद्धीनंतर त्यावर चांगले अभिप्राय आले. त्या काळातील इंग्रजी प्रभुत्वाखालील टाइम्समध्ये पण परीक्षण आले.

मी पहिल्या पत्रात म्हटले आहे, की एक एक वर्ष जात होते व अशक्य वाटणारी एक एक गोष्ट शक्य होत गेली. त्यातील एक म्हणजे जन्मशताब्दी अंक. माझी समजूत होती की जन्मशताब्दीसारखे सोहळे फक्त फार मोठ्या लोकांसाठी असतात.



दात्यांसारख्यासाठी नाही. तसेच शताब्दी म्हणजे १०० वर्षे. त्याच्याशी आपला काही संबंध येणार नाही. हे दोन्ही समज 'ज्ञानगंगोत्री'ने चुकीचे ठरविले.

कै. दाते यांचे कॉलेज शिक्षण पुण्याच्या स.प. महाविद्यालयात झाले. श्री. द. वा. पोतदार यांचे ते शिष्य बहुधा शेवटून दुसऱ्या वर्षाला असताना त्यांनी कॉलेज सोडले. त्याचे कारण गूढच राहिले आहे. पण त्यामुळे त्यांना पदवी नव्हती. तरी पण त्यांचा 'मराठी ग्रंथ सूचि' हा ग्रंथ श्री. डोंगरे यांनी पीएच. डी.साठी विषय म्हणून निवडला हे वाचून फारच आनंद वाटला. जणू काही दात्यांनाच पदवी मिळाल्यासारखे वाटते.

माझ्या मागील पत्रात सूचीमध्ये ग्रंथ किंवा नियतकालिकांच्या उपलब्धी स्थळांचा निर्देश करण्याबद्दल काही लिहिले आहे. त्यासंबंधीचे माझे आक्षेप पुढीलप्रमाणे –

(१) ग्रंथालये किंवा इतर ग्रंथसंग्रहक ग्रंथ कायम जपून ठेवण्यास बांधील नसतात.

(२) सार्वजनिक सोडली तर इतर ग्रंथालये किंवा संग्राहक ग्रंथ दाखविण्यास बांधील नसतात.

(३) उपलब्धी स्थळ फक्त एकच (Exclusive) असते असे नाही. ती अनेक असू शकतात. ती सर्वच देणे शक्य नसते. उपलब्धी स्थळांचा निर्देश करण्यापूर्वी उपलब्धी स्थळाची व्याख्या स्पष्ट करणे आवश्यक आहे. ''जेथे सूचिकारास तो ग्रंथ किंवा मासिक सापडले ते ठिकाण'', असे ते स्पष्टीकरण.

(४) उपलब्धी स्थळाचा नुसता निर्देश करून उपयोग नाही; तर संपूर्ण पत्ता द्यावयास हवा. मोठ्या संस्था सोडल्या तर हे पत्ते किती वारंवार बदलत असतात हे आपणास माहीतच आहे.

या सर्वांचा विचार करता असे वाटते की सूचिकारांनी ही उपलब्धी स्थळाची माहिती देण्याऐवजी ग्रंथालयांनीच आपल्याजवळील ग्रंथांची यादी मधून-मधून प्रसिद्ध करावी.

उपलब्धी स्थळांचा हा मुद्दा कोठे उपस्थित झाला याचा विचार करता व जन्मशताब्दी अंक चाळत असता असे लक्षात आले की श्री. डोंगरे यांच्या लेखात 'पाहिजे' या यादीत तो आला आहे (पृ. ३७). पण जागतिक पातळीवर या बाबतीत काही विचार झाला आहे का याची माहिती कुणी दिल्यास उपयुक्त ठरेल. निदान १५-२३८१-१९६३ या मानकात त्याचा उल्लेख नाही.

माझ्या मागच्या पत्र क्र. २ मध्ये मी श्री. डोंगरे यांच्या लेखातील 'सूचीतील त्रुटी' (पृ. ३७) याचा उल्लेख केला होता. त्यांच्या मते १८००-१९१७ या कालखण्डातील पुस्तकांची यादी (सूची) उपलब्ध होती. त्यामुळे त्यातील पुस्तकांची नव्याने शोधाशोध करावी लागली नसती. श्री. दाते यांचे याबद्दलचे मत त्यांच्याच लेखात पृ. १८ वर दिलेले आहे. हे मत जर मान्य नसेल तर दुसरे उत्तर असे की सूचिकार्याबद्दल दाते यांचा जेवढा

सत्कार व गौरव झाला तेवढा त्यांच्या आधीच्या सूचिकारांचा झाला नसावा व नंतरच्याही सूचिकारांचा झाला नाही तो का ? जणू काही 'झाले बहु, होतील बहु, परंतु या सम हा' असे प्रशस्तिपत्रच जनतेने त्यांना दिले व पर्यायाने त्यांचे मत ग्राह्य धरले. 'ग्रंथसूचि' या सामान्यनामाचे दात्यांनी विशेषनामात रूपांतर केले. ग्रंथसूची म्हटले की लोकांच्या डोळ्यांसमोर येते ती मराठी ग्रंथसूची १८००-१९५०. तेव्हा या नावाचा उपयोग सामान्यनामाप्रमाणे करावयाचा झाल्यास त्याचा दर्जा सांभाळण्याची जबाबदारी नव्या ग्रंथकारावर येते.

– सु. शं. दाते
१७५/४८८७ पंतनगर,
घाटकोपर पूर्व, मुंबई ४०००७५

❑❑❑



# लेखक परिचय

**डॉ. एस. आर. बाहेती** : एम. कॉम. एम.लिब., एम.फिल., पीएच. डी., एल.एल.बी., संस्कृत विशारद. श्रीमती लरातो वाणिज्य महाविद्यालय अकोला येथे ग्रंथपाल आणि ग्रंथालयशास्त्र विभाग प्रमुख. एकूण ३२ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव, य.च.म.मुक्त विद्यापीठाच्या बी.लिब., एम.लिब., एम.फिल. शिक्षणक्रमाचे केंद्र संयोजक, पीएच.डी.चे मार्गदर्शक, महाविद्यालयीन तसेच सार्वजनिक ग्रंथालयाच्या विविध संघटनांचे सक्रिय पदाधिकारी व भरीव कार्य. आठ पुस्तके, सहा स्मरणिकांचे लेखन, संपादन व अनुवाद, ३५ शोधनिबंध व २०० हून अधिक लेख, ग्रंथपरीक्षण विविध वर्तमानपत्रे व मासिकांतून प्रकाशित. ग्रंथालयशास्त्रावरील तीन आंतराष्ट्रीय, ३० राष्ट्रीय व २० राज्यस्तरीय परिषदांमध्ये सक्रिय सहभाग. संस्कारशिबिरे, व्यवसाय मार्गदर्शन शिबिर, योग शिबिर, निसर्गोपचार व ॲक्युप्रेशर चिकित्सा शिबिराचे आयोजन व मार्गदर्शन. विद्यार्थी प्रिय शिक्षक व अभ्यासक, युजीसी द्वारे स्वीकृत लघु संशोधन प्रकल्प (Minor Research Project) चे काम प्रगतिपथावर आहे.

**प्रा. अ. श. सोनोने** : य.च.म. मुक्त विद्यापीठातून बी.लिब आणि एम.लिब. परीक्षा अकोला केंद्रावरून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. तसेच सेट परीक्षा उत्तीर्ण. अकोला येथील सीताबाई कला महाविद्यालयात २ वर्षांपासून ग्रंथपाल म्हणून कार्यरत. लरातो महाविद्यालय - अकोला अभ्यासकेंद्रात बी.लिब., एम.लिब चे संमंत्रक, ग्रंथालयशास्त्रावर २ लेख व ३ शोध निबंध प्रकाशित.

**महेंद्र आढाव** : नाशिक येथील क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात कार्यरत आहेत.

# LIB 013

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

ज्ञानगंगा घरोघरी

*संपादक*

डॉ. रमेश वरखेडे

*कार्यकारी संपादक*

डॉ. राजेंद्र कुंभार

*संपादक मंडळ*

श्री. मधुकर शेवाळे

श्री. प्रवीण घोडेस्वार

डॉ. प्रदीप कर्णिक

*व्यवस्थापक*

श्री. मधुकर शेवाळे

© २००७

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

*निर्मिती*

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ

*मुद्रक*

श्री. अरविंद पोतनीस, श्री ऑफसेट प्रेस, ७ ए, नाईस, सातपूर, नाशिक - ७

*प्रकाशक*

डॉ. राजेंद्र वडनेरे, प्रभारी कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२.

# ज्ञानगंगोत्री

**वर्ष ७ वे** **डिसेंबर २००६ - जानेवारी-फेब्रुवारी २००७** **अंक ३**

## *अनुक्रमणिका*

| | | |
|---|---|---|
| ❑ संपादकीय | : | २ |
| ❑ सेमॅन्टिक वेब संकल्पना : भाग - १ | : डॉ. नागनाथ रा. रामदासी | ४ |
| ❑ कन्सॉरशिया : सहकारी ग्रंथालय व्यवस्था | : विजय देवधर | ८ |
| ❑ डिजिटायझेशन कार्यातील विविध घटकांच्या जबाबदाऱ्या व योगदान | : डॉ. राजेंद्र कुंभार | १७ |
| ❑ ग्रंथालयांच्या अनुदान प्रारंभाचे आठशेव्या वर्षात पदार्पण | : डॉ. प्रदीप कर्णिक | २५ |
| ❑ प्रभावित करणारे ग्रंथ | : प्रा. के. बी. देशमुख | ३० |
| ❑ तंत्रशिक्षणसंस्था व अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालयातील ऑनलाईन वाचनसाहित्याची नवी वाटचाल : INDEST-Consortium | :प्रकाश बोडके / महेंद्र आढाव | ४० |
| ❑ वाचनसंस्कृती संवर्धनात आकाशवाणीचे योगदान | : डॉ. एस. आर. बाहेती / प्रा. अ. श. सोनोने | ४८ |
| ❑ पत्रव्यवहार | : | ५८ |

| | | |
|---|---|---|
| सुट्या अंकाची किंमत | : संस्था रु. ५० | व्यक्ती : रु. ३० |
| वार्षिक वर्गणी | : संस्था रु. २०० | व्यक्ती : रु. १२० |

मागील अंक उपलब्धतेनुसार पाठविले जातील. वर्गणीचा धनाकर्ष (डीडी) 'वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक' या नावे काढलेला आणि नाशिक येथे देय असावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**वर्गणी व व्यवस्थापन -** प्रा. मधुकर शेवाळे, सहायक ग्रंथपाल, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२.

**संपादकीय (साहित्य पाठविण्यासाठी) -** डॉ. राजेंद्र कुंभार, २, अंकित, लिटल हार्ट, स्वामी समर्थ गार्डनजवळ, निर्मला कॉन्व्हेंटच्या पाठीमागे, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.

● या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.